। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ४३ वा । शनिवार दिनांक १८ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## अक्षय तृतीयेवर बालविवाहास ठाम नकार
### 'गुन्हा नोंद करा- जिल्हाधिकाऱ्यांचे कडक आवाहन

धाराशिव, (जिमाका) समाजातील बालकांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षण,आरोग्य व सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी बालविवाहास आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे.याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी नागरिकांना थेट आणि ठाम आवाहन करत,१९ एप्रिल २०२६ रोजीच्या अक्षय तृतीया मुहूर्तावर कोणत्याही ठिकाणी बालविवाह आढळल्यास तात्काळ गुन्हा नोंदवावा,असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ संपूर्ण राज्यात लागू असून त्यासोबत महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २०२२ देखील अंमलात आहेत.

केंद्र शासनाच्या 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत बालविवाह रोखण्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.या कायद्यानुसार ग्रामसेवक यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे,तर ग्रामीण भागात अंगणवाडी सेविका आणि शहरी भागात पर्यवेक्षिका यांची सहाय्यक बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.या कायद्याअंतर्गत बालविवाह करणे किंवा आयोजित करणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे.

अक्षय तृतीया हा शुभ मुहूर्त मानला जात असल्यामुळे या दिवशी राज्यात मोठ्या प्रमाणावर सामूहिक तसेच वैयक्तिक विवाह सोहळे आयोजित केले जातात.मात्र,याच दिवशी बालविवाह होण्याची शक्यता जास्त असल्याचे लक्षात घेता,जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दि.१९ एप्रिल रोजी संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी पोलीस विभाग,बाल संरक्षण समिती तसेच इतर यंत्रणांच्या समन्वयाने प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे. जिल्ह्यात बालविवाह होऊ नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना राबविणे,व्यापक जनजागृती करणे आणि '१०९८' चाइल्ड हेल्पलाईन या टोल फ्री क्रमांकाचा प्रचार-प्रसार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी तथा बालविवाह प्रतिबंध अधिकारी, अंगणवाडी सेविका तथा सहाय्यक बालविवाह प्रतिबंध अधिकारी तसेच कोणत्याही सजग नागरिकांनी बालविवाहाची घटना आढळल्यास तात्काळ हस्तक्षेप करून ती थांबवावी आणि त्याबाबतचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,धाराशिव यांच्याकडे सादर करावा,असेही आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा टास्क फोर्स (बालविवाह प्रतिबंध) अध्यक्ष कीर्ती किरण पूजार यांनी स्पष्ट केले आहे की,अक्षय तृतीया या मुहूर्तावर बालविवाह झाल्याचे आढळल्यास बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ व नियम २०२२ अंतर्गत पालक,आचारी,मंडप मालक, पुजारी/काझी,वाजंत्री,हॉल चालक, स्वयंपाकी,उपस्थित नातेवाईक, विवाह आयोजक आणि संबंधित सर्व नागरिकांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात येईल. बालविवाहाची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णतः गोपनीय ठेवण्यात येईल,अशी हमी प्रशासनाने दिली आहे.

समाजाच्या भविष्यासाठी प्रत्येक बालकाचे बालपण सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे बालविवाहास ठाम नकार देत,कायद्याच्या अंमलबजावणीत सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे भावनिक आणि कडक आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी केले आहे.

## पवनचक्कीतील तांब्याच्या तारा लुटणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात, अन्य ०८ गुन्हे उघडकीस

धाराशिव (प्रतिनिधी)-दि ०७.०४.२०२६ रोजी पोस्टे बेंबळी हददीत उमरेगव्हाण शिवारात पवनचक्कीचे ०२ सुरक्षारक्षकांना दोरीने बांधून त्यांना मारहाण करून तेथील ट्रान्सफॉर्मर मधील तांब्याच्या तारा व रोख रक्कम चोरी केल्यावरून पोस्टे बेंबळी ९९/२०२६ क ३०९ (६),४२७(२), ३(५) भान्यासं अन्वये अनोळखी इसमांविरूदध गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशाच प्रकारे पवनचक्कीचे साहित्य चोरीचे गुन्हे धाराशिव जिल्हयात दाखल झाले होते.

सदरचे गुन्हे अतिसंवेदनशील व गंभीर स्वरूपाचे असल्याने मा. श्रीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी तात्काळ उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना आदेशित केले होते.

दि १६.०४.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक यांनी गोपनीय बातमीदार यांचेकडून प्राप्त माहितीवरून ०५ संशयित आरोपींना ढोकी कळंब रोडवर गोविंदपूर पाटी येथून त्यांचे ०३ वाहने व । मुददेमालासह ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचे अन्य साथीदारांचे सोबत मिळून मेंढा, उमरेगव्हाण चिकुंद्रा, गंधोरा, कन्हेरवाडी, वाशी शिवारात पवनचक्कीचे साहित्य चोरी केले । असल्याचे तसेच त्यावेळी तेथील सुरक्षारक्षकांना भिती बसण्यासाठी मारहाण केली असल्याचे कबूल केले. ताब्यात घेतलेल्या ०५ इसमांकडून रोख रक्कम, तांब्याच्या तारा व ०२ महिंद्रा स्कॉर्पियो, ०१ बोलेरो असा एकूण ४२,००,००० रूपयांचा मुददेमाल ताब्यात घेण्यात आला आहे. नमुद आरोपींनी सांगितलेवरून त्यांचेकडून दरोडा, चोरी असे ०८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

अटक करण्यात आलेल्यांची नावे सुनिल रा ढोकी, लखन रा उपळा, सिद्राम रा. वरूडा, उदधव रा बावी, ५) विक्रम रा खामकरवाडी अशी असून त्यांचे अन्य साथीदार फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. नमुद आरोपी व जप्त मुददेमाल पुढील कारवाईस्तव पोस्टे बेंबळी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ीमती रितू खोखर, पोलीस अधिक्षक धाराशिव व मा. श्रीमती शफकत आमना, अपर पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, गणेश पाटील (पोस्टे बेंबळी), पोउपनि शिवाजी भुतेकर ( पोस्टे बेंबळी) पोह शौकत पठाण, पोह जावेद काझी, पोह फरहान पठाण, चापोह नागनाथ गुरव, रत्नदिप डोंगरे यांचे पथकाने केली आहे.

## क्राईम न्युज

### लैंगीक अत्याचार

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १५ वर्षीय मुलगी दि.०१.०४.२०२५ते ०४.०४.२०२६ रोजी हिस गावातील एका तरुणाने तु मला आवडतेस असे म्हणून तिचे घरी व त्याचे घरी घेवून जावून वारंवार तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. घडल्या प्रकारा बाबात कोणास काही एक सांगीतले तर तुला व तुझे आईला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१६.०४.२०२६ रोजी दिलेल्या वैद्यकीय जबाबावरुन भा.न्या.सं.कलम-६४(२)(ळ) (एम), ६५(१), ७८, ३५१(२) (३), सह कलम ४,६,८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याच्या दागिण्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भारत शेका गोफणे, वय ६० वर्षे, रा. सोनेगाव ता. जि. धाराशिव यांचे घराचा पुढे केलेला दरवाजा अज्ञात व्यक्तीने दि.१५.०४.२०२६ रोजी उघडून आत प्रवेश करुन घरातील १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ६९,००० किंमतीच चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भारत गोफणे यांनी दि.१६.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी दि.१६.०४.२०२६ रोजी २०.१५ वा. सु. तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत जयभवानी पान टपरीच्या मागे घाटशिळ पार्कींग येथे छापा टाकला. यावेळी भारत रा. शुक्रवार पेठ तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे २०.१५ वा. सु जयभवानी पान टपरीच्या मागे घाटशिळ पार्कींग येथे मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्या एकुण १,२८० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### राहते घरासमोरुन मोटारसायकलची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नागनाथ लक्ष्मण चव्हाण, वय ३४ वर्षे, रा. वात्सलानगर चिवरी पाटी अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.१२.०४.२०२६ रोजी नागनाथ चव्हाण यांचे राहते घरासमोरुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नागनाथ चव्हाण यांनी दि.१६.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## धाराशिवच्या सर्वांगीण प्रगतीस नवी दिशा
### शाश्वत विकास ध्येय जिल्हा निर्देशक आराखड्याचे प्रकाशन

धाराशिव (जिमाका) जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'शाश्वत विकास ध्येय-जिल्हा निर्देशक आराखडा, धाराशिव जिल्हा' या सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या दोन पुस्तकांचे प्रकाशन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार आणि अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,मुंबई यांच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या कार्यक्रमाला अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय,मुंबई येथील अतिरिक्त आयुक्त श्री.भांगे,निवासी उपजिल्हाधिकारी श्री.विद्याचरण कडवकर,जिल्हा नियोजन अधिकारी श्री.पुंडलिक गोडसे,जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे प्र. उपआयुक्त श्री.सु.न.जाधव तसेच सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी,सोलापूर श्रीकांत कुंटला यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय,धाराशिव येथील कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.शाश्वत विकासाच्या विविध निर्देशकांवर आधारित तयार करण्यात आलेला हा आराखडा जिल्ह्याच्या नियोजन प्रक्रियेस दिशा देणारा ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

जिल्हा निर्देशक विकास आराखडा हा केवळ आकडेवारीचा संच नसून, जिल्ह्याच्या विकासाचा मार्गदर्शक नकाशा आहे.शिक्षण,आरोग्य,पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन,महिला व बालकल्याण, रोजगार निर्मिती अशा विविध क्षेत्रांतील प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी या आराखड्यात ठोस निर्देशक निश्चित करण्यात आले आहेत.यामुळे विकासाच्या कामांना अधिक पारदर्शकता, परिणामकारकता आणि गती मिळणार आहे.तसेच,या आराखड्याच्या माध्यमातून प्रशासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सुलभ होणार असून,उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून जिल्ह्याच्या गरजेनुसार प्राधान्यक्रम ठरवता येणार आहे.परिणामी,शाश्वत आणि समतोल विकास साध्य करण्यासाठी हा आराखडा मार्गदर्शक ठरेल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## निर्घृण खूनाने हादरला धाराशिव! ३५ वर्षीय तरुणाची अमानुष हत्या : पत्नीसमवेत सात जण ताब्यात

**धाराशिव( रामेश्वर डोंगरे )**- जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे घडलेल्या एका थरारक खून प्रकरणाने संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे. कृष्णाथ साठे (वय ३५) या तरुणाची अत्यंत निर्दयी पद्धतीने हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी कृष्णाथ साठे हे गावालगत असलेल्या ओढ्याजवळ गेले होते. मात्र बराच वेळ उलटूनही ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला. काही वेळानंतर गावातील नागरिकांना ओढ्याच्या काठावर झाडाखाली रक्ताच्या थारोळ्यात त्यांचा मृतदेह आढळून आला.

प्राथमिक तपासात समोर आले की, अज्ञात आरोपींनी कृष्णाथ यांच्या डोक्यात मोठा दगड घालून आणि धारदार शस्त्राने सपासप वार करून त्यांची हत्या केली. एवढ्यावरच न थांबता, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह तब्बल ९० फूट अंतरावर ओढून नेऊन झाडाखाली फेकण्यात आला.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या खूनामागे अनैतिक संबंधांचा धागा असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या संशयावरून पोलिसांनी मृताच्या पत्नीसह गावातील आणखी ७ संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

तुळजापूर पोलिसांनी या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केला असून, पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाची मदत घेतली जात आहे. या गुन्ह्याचा उलगडा लवकरच होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

एका निरपराध तरुणाची एवढ्या क्रूरपणे हत्या होत असेल, तर कायदा-सुव्यवस्था कुठे आहे? आरोपींना कठोर शिक्षा होणार का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## युवा कार्यकर्त्यांसाठी सुवर्णसंधी
### जिल्हा युवा पुरस्कारासाठी २१ एप्रिल पर्यंत अर्ज मागविले

धाराशिव, (जिमाका)- राष्ट्र व राज्य निर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून राज्यात मोठ्या प्रमाणावर युवा वर्ग व विविध संस्था सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.युवकांमधील सुप्त गुणांना वाव देणे,त्यांच्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणे आणि त्यांचा गौरव करणे आवश्यक आहे.याच पार्श्वभूमीवर राज्याच्या युवा धोरणांतर्गत सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रदान केले जातात.

सन २०२५-२६ या वर्षासाठी धाराशिव जिल्ह्यातील युवकांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे,यासाठी जिल्हास्तरावर एक युवक, एक युवती आणि एक नोंदणीकृत संस्था यांना 'जिल्हा युवा पुरस्कार' देण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप व्यक्तींसाठी गौरवपत्र,सन्मानचिन्ह व प्रत्येकी १० हजार रुपये रोख पारितोषिक असे असून संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व ५० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

पुरस्कारासाठी युवक,युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य विचारात घेतले जाणार आहे.यामध्ये राज्याच्या साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन,राष्ट्र उभारणीस सहाय्यभूत ठरणारे उपक्रम,समाजातील दुर्बल घटक,अनुसूचित जाती-जमाती, जनजाती व आदिवासी भागासाठीचे कार्य,शिक्षण,प्रौढ शिक्षण,रोजगार, आरोग्य,पर्यावरण,सांस्कृतिक कला,क्रीडा व मनोरंजन,विज्ञान-तंत्रज्ञान,व्यवसाय,महिला सक्षमीकरण,स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठीचे कार्य आदी क्षेत्रांचा समावेश आहे.तसेच राष्ट्रीय एकात्मता वाढविणारे उपक्रम,नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा,झोपडपट्टी विकास,आपत्ती व्यवस्थापन, स्थानिक समस्या सोडविण्यासाठीचे प्रयत्न,साहसी उपक्रम आदी बाबींचाही विचार करण्यात येणार आहे.

अर्जदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत मागील तीन वर्षांतील कार्याच्या आधारे करण्यात येईल.

सविस्तर माहिती व अर्जासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे संपर्क साधावा.इच्छुक युवक,युवती व नोंदणीकृत संस्थांनी आपले परिपूर्ण अर्ज दिनांक २१ एप्रिल २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धाराशिव येथे सादर करावेत,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

## त्रिकोळी येथील शेख जिंदावली ऊरूसाची जंगी कुस्त्यांनी सांगता

धाराशिव (शेख अंजुम)- उमरगा तालुक्यातील त्रिकोळी येथे शेख जिंदावली ऊरूसास गुरुवारी प्रारंभ झाला असून शुक्रवारी जंगी कुस्त्यांच्या मैदानाने यात्रेची सांगता होणार आहे. त्रिकोळी येथील शेख जिंदावली ऊरूसाला जुनी आणि समृद्ध परंपरा आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. शुक्रवारी जंगी कुस्त्यांचा थरार झाला. कुस्त्यांना मोठी परंपरा असून आतापर्यंत अनेक नामवंत पैलवानांनी या मैदानात आपली हजेरी लावली आहे. हिंदकेसरी पैलवान कै. हरिश्चंद्रमामा बिराजदार, बोरामणीचे महाराष्ट्र केसरी अप्पालाल शेख यांनी या मैदानाला गौरव प्राप्त करून दिला आहे. तसेच राजाराम पैलवान, शिवाजी शहापुरे, अल्लाऊद्दीन शेख यांसारख्या नामांकित मल्लांनीही येथे कुस्त्या गाजवल्या आहेत.

याशिवाय महाराष्ट्र चॅम्पियन सागर बिराजदार, ज्ञानेश्वर गोचडे, जीवन बिराजदार यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील मल्लांनीही या मैदानात आपली छाप सोडली आहे. या मैदानावर मोठ्या प्रमाणावर कुस्त्यांचे सामने आयोजित केले होते. त्यामुळे पंचक्रोशीतील पैलवानांनी मोठ्या संख्येने कुस्त्यांच्या फडाला उपस्थित होते यात्रेकरूचे स्वागत ऊरूस कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

ऊरूस हे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक त्रिकोळी येथील शेख जिंदावली ऊरूस हा हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक मानला जातो. येथील दर्ग्याचा कारभार हिंदू समाजातील लोक पाहतात. तसेच ऊरूस पार पाडण्याची जबाबदारीही गावातील हिंदू समाजातील लोकच घेतात. यात्रेनिमित्त गावातील प्रत्येक घर पाहुण्यांनी गजबजलेले असते. सर्व धर्मांचे लोक भक्तिभावाने या यात्रेत सहभागी झाले होते.

## सोनारी येथे काळभैरवनाथ यात्रेत सोन्याच्या चैनीची चोरी

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आनंद अशोकराव पांडे, वय ४०वर्षे, रा. धानोरा बु.ता.अंबाजोगाई जि. बीड यांची अंदाजे ८०,००० किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन ही दि.१५.०३.२०२६ रोजी सोनारी येथे काळभैरवनाथ यात्रेत वाय चौक येथे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आनंद पांडे यांनी दि.१५.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## चारीत पडून गंभीर जखमी होवून मयत

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दिलीप व सोबत मयत नामे-उमेश रमेश वाघमारे, वय ३२ वर्षे, दोघे रा. लखनगाव ता. औसा जि.लातुर हे दोघे दि.१९.०३.२०२६ रोजी मोटरसायकल क्र एमएच २४ सी.ए.५३५० वरुन जात होते. दरम्यान कामेगावशिवारातील औसा ते धाराशिव जाणारे रोडवरील तेरणा नदीचा पुलाच्या पुढे दिलीप बंडगर यानी त्याचे ताब्यातील मोटरसायकल हा हायगयी व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकल स्लीप झाल्याने पाठीमागे बसलेले उमेश वाघमारे रोडलगत असलेल्या चारीत पडून गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अभिजीत अनंत चव्हाण, वय ३० वर्षे, रा. हातोला ता. अंबाजोगाई जि. बीड यांनी दि.१५.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६ (१), २८१ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# वाढदिवस सहकार महर्षींचा

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा वाढदिवस साजरा करताना मनापासून आनंद होतो कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात वैराला स्थानच नाही, ते सर्वांचेच मित्र आहेत. कोणालाही आपलेसे करून घेण्याची त्यांची विलक्षण क्षमता हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे. राज्यभर ओळख असलेले हे भारदस्त नेतृत्व त्यांच्या वेगळ्या, पारदर्शक आणि प्रामाणिक शैलीमुळे अधिक उठून दिसते. सत्याला धरून चालण्याची त्यांची भूमिका इतकी ठाम आहे की, स्वार्थी आणि लबाड प्रवृत्तीची माणसे त्यांच्या अवतीभवती फिरकण्याचे धाडस करत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची नैतिक ताकद आहे, जी लोकांना विश्वास देणारी आणि प्रेरणा देणारी आहे. एखाद्याचे काम करायचे म्हणजे ते प्रामाणिकपणे, वेळेत आणि पूर्णत्वास नेण्याचा त्यांचा स्वभाव आहे. विनाकारण आश्वासने देणे त्यांच्या स्वभावात नाही; शब्द दिला म्हणजे काम झालेच पाहिजे हा त्यांचा पक्का नियम आहे. त्यामुळेच सामान्य माणसाचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास आहे. माजी राज्यमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी अनेक धाडसी आणि लोकहिताचे निर्णय घेतले. कामात पारदर्शकता आणि कार्यक्षमतेला प्राधान्य देत त्यांनी विकासाची गती वाढवली. दिवंगत विलासराव देशमुख यांच्या पश्चात लातूरकरांना जी पोकळी जाणवत होती, त्या कठीण काळात दिलीपराव देशमुख यांनीच लोकांना धीर दिला. त्यांनी केवळ नेतृत्व स्वीकारले नाही, तर जनतेचा विश्वास टिकवून ठेवत नव्या उमेदीने विकासाची वाट चालू ठेवली. विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीचा आणि लोकाभिमुखतेचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे नेला. राज्यात अनेक नेते आहेत, परंतु दिलीपराव देशमुख यांची छाप वेगळीच आहे. सहकार चळवळ केवळ पश्चिम महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले. मराठवाड्यात सहकार क्षेत्रात नवी ऊर्जा निर्माण करण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक सहकारी संस्था यशस्वीपणे चालत आहेत. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असो किंवा विविध साखर कारखाने, त्यांनी या सर्व क्षेत्रांत व्यवस्थापन, नियोजन आणि पारदर्शकतेचा आदर्श निर्माण केला आहे. सहकार म्हणजे केवळ व्यवहार नाही, तर तो समाजाच्या सर्वांगीण आर्थिक उन्नतीचा मार्ग आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. सूक्ष्म नियोजन, दूरदृष्टी आणि धाडसी निर्णयक्षमतेच्या जोरावर त्यांनी तोट्यातील संस्था नफ्यात आणल्या. ज्या ठिकाणी अनेक सहकारी संस्था बंद पडल्या, तिथे त्यांनी नवसंजीवनी दिली. त्यांच्या कार्यामुळे सहकार क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून अनेक तरुणांना या क्षेत्राकडे वळण्याची प्रेरणा मिळाली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी साखर कारखान्यांची उभारणी अत्यंत महत्त्वाची ठरते, हे त्यांनी ओळखले. मांजरा पट्ट्यात मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन होत असल्याने त्यांनी त्या भागात साखर कारखाने उभारण्याचा निर्णय घेतला. यामागे केवळ उद्योग उभारणीचा हेतू नव्हता, तर शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा व्यापक विचार होता. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, त्यांचा ऊस शेतात पडून राहू नये, यासाठी त्यांनी विशेष लक्ष दिले. कोणाचाही ऊस गाळपाविना राहू नये ही त्यांची भूमिका आजही तितकीच ठाम आहे. त्यांनी यासाठी प्रशासनाला स्पष्ट सूचना देऊन कार्यक्षम यंत्रणा उभी केली. त्यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्यावरचा विश्वास अधिक दृढ झाला. साखर कारखान्यांच्या माध्यमातून त्यांनी केवळ उत्पादन वाढवले नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी दिली. साखर कारखान्यांच्या माध्यमातून त्यांनी केवळ शेतकऱ्यांचेच नव्हे, तर कामगारांचेही हित जपले. अनेक कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. स्थानिक तरुणांना रोजगार मिळाल्याने स्थलांतर कमी झाले आणि गावांची अर्थव्यवस्था मजबूत झाली. आज अनेक कामगार दोन-चार चाकी वाहनांवरून कामावर जाताना दिसतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य आणि स्वावलंबनाची भावना निर्माण झाली आहे. दिलीपराव देशमुख हे कमी बोलून अधिक काम करणारे नेते म्हणून ओळखले जातात. बघू किंवा करू हे शब्द त्यांच्या शब्दकोषात नाहीत. त्यांच्या कार्यपद्धतीत वेळेचे भान, शिस्त आणि लोकाभिमुखता दिसून येते. त्यांच्या कार्यालयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे काम होईल, हा विश्वास लोकांच्या मनात आहे. त्यांनी कधीही कोणाला नाराज केले नाही; उलट सर्वांची कामे करून आशीर्वाद कमावले आहेत. त्यांच्या साधेपणामुळे आणि कडकभुमिकेने ते सर्वसामान्यांपर्यंत सहज पोहोचतात. त्यांच्या वडिलांचा परोपकारी वारसा आणि विलासराव देशमुख यांचे दूरदर्शी नेतृत्व यांचा प्रभाव त्यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसतो. देशमुख कुटुंबाने लातूरच्या विकासात दिलेले योगदान अतुलनीय आहे. आजही लातूरमध्ये या कुटुंबाची ओळख आणि प्रभाव कायम आहे. त्यांनी त्या परंपरेला न्याय देत नवे आदर्श निर्माण केले आहेत. सहकार क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. विविध सामाजिक उपक्रम, शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणले. सहकारातून समाजकार्य करणे अवघड असते, परंतु त्यांनी ते यशस्वीपणे करून दाखवले. त्यामुळे लातूरकरांच्या मनात त्यांच्याबद्दल विशेष स्थान निर्माण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम राबवले गेले, त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या गरजा ओळखून निर्णय घेतले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना बळ मिळाले आणि त्यांचा आत्मविश्वास वाढला. आज त्यांच्या पंच्याहत्तरीच्या निमित्ताने त्यांच्याकडे पाहिले, तर त्यांचा उत्साह, कार्यतत्परता आणि सकारात्मक दृष्टिकोन अजूनही तितकाच तरुण वाटतो. निरोगी शरीर, शिस्तबद्ध जीवनशैली आणि जनसेवेची अखंड तळमळ यामुळेच त्यांना जनतेचा आशीर्वाद लाभत आहे. त्यांनी स्वतःच्या जीवनातून स्वतः निरोगी राहा आणि समाजासाठी काम करा हा संदेश दिला आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद नव्हे, तर जबाबदारी आणि जनतेशी असलेले नाते असते, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या कार्यपद्धतीत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकहिताचा विचार कायम दिसून येतो. त्यामुळेच ते केवळ नेते नसून लोकांच्या मनातील विश्वासाचे प्रतीक बनले आहेत.

त्यांचा वाढदिवस साजरा करताना खरा आनंद यासाठी होतो की आपण एका योग्य, प्रामाणिक, दूरदर्शी आणि जनहितैषी नेत्याचा सन्मान करीत आहोत. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळत आहे आणि भविष्यातही मिळत राहील.

ईश्वर त्यांच्या आयुष्यात उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड ऊर्जा प्रदान करो, हीच प्रार्थना. त्यांनी केलेली जनसेवा अशीच अविरत सुरू राहो आणि समाजाच्या प्रगतीत त्यांचे योगदान अधिकाधिक वाढत राहो याच मनःपूर्वक शुभेच्छा!

# दिलीपराव देशमुख सहकार क्षेत्रातले ७५ वर्षांचे दीपस्तंभ



सहकार क्षेत्र हे ग्रामीण भारताच्या आर्थिक उन्नतीचे अत्यंत महत्त्वाचे शस्त्र आहे. या सहकारी चळवळीला महाराष्ट्रात दिशा देणारे अनेक द्रष्टे नेते होऊन गेले. अशाच सहकार क्षेत्रातील यादीत एक प्रभावशाली नाव अभ्यासू व्यक्तिमत्व असलेलें सहकार महर्षी राज्याचे माजी मंत्री आदरणिय दिलीपराव देशमुख साहेब यांनी सहकार क्षेत्रात ७५ वर्षांची कृतिशील, सामाजिकदृष्ट्या बांधिलकी असलेली वाटचाल पूर्ण केली आहे. ही केवळ कालमर्यादा नसून, एक संपूर्ण युग आहे आज त्यांचा वाढदिवस व अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा होत आहे त्यांना खुप खूप शुभेच्छा

**सहकाराची माती आणि दिलीपरावांचे रोप**

लातूर जिल्ह्याच्या मातीतून उगम पावलेले बाभळगाव येथील सुपुत्र लोकनेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख साहेब यांचे बंधू आदरणीय दिलीपराव देशमुख हे शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख, अडचणी आणि त्यांच्या विकासासाठी झटणारे व्यक्तिमत्व. म्हणून साऱ्या राज्याला परिचित असणारे हे नेतृत्व आहे त्यांनी सहकार म्हणजे केवळ संस्था उभारणे नव्हे, तर ती संस्था लोकांसाठी झिजवणे, लोकांच्या हातात आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण देणे, असा दृष्टिकोन स्वीकारला सहकारी संस्थांची उभारणी त्यांनी अनेक सहकारी साखर कारखाने, पतसंस्था, सहकारी बँका आणि कृषी संस्था स्थापन करून ग्रामीण भागात शाश्वत रोजगार, उत्पन्नवाढ आणि शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवले. त्यांचे नेतृत्व, व्यवस्थापन कौशल्य, आणि लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते यामुळे या संस्था आजही कार्यरत व यशस्वी आहेत त्याचे सर्व श्रेय दिलीपराव देशमुख साहेब यांच्याकडे जाते

**सहकारातून आर्थिक विकास**

सहकार म्हणजे केवळ आर्थिक कार्य नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचा प्रभावशाली मार्ग असतो, हे ओळखून दिलीपराव देशमुख यांनी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, आणि प्रशिक्षण केंद्रे उभारून तरुण पिढीला सक्षम केलं. त्यांचे कार्य म्हणजे एक प्रकारे सहकारातून समाजकारण साधणं. नेतृत्वाची खास शैली ते केवळ एक संस्थापक नाही तर प्रत्येक सदस्याचा सल्लागार, मार्गदर्शक आणि हितचिंतक आहेत त्यांचे कार्य ''लोकांनी उभे केलेली संस्था, लोकांच्या हक्कासाठी चालवलेली संस्था'' या तत्त्वावर आधारित होते. त्यांनी ''शेती आणि सहकार हे एकमेकांचे पूरक'' असल्याचे नेहमी अधोरेखित केले त्यामुळे आज आपल्याला लातूर जिल्ह्यात सहकार क्षेत्र व त्यावर चालणाऱ्या संस्था ताठ मानेने उभ्या आहेत जिल्ह्यात आज मांजरा परिवारातील सहकारी संस्था साखर उद्योग मोठ्या प्रमाणात चालु आहेत जिल्ह्यात मांजरा साखर परिवाराचे मांजरा,रेणा, जागृति, विलास १, विलास २, मारुती, ट्वेन्टी वन शुगर कारखाने सुरू आहेत या साखर कारखान्याच्या माध्यमातून दरवर्षी ऊस उत्पादक शेतकरी यांना गाळप पोटी जवळपास १५०० ते १८०० कोटी रुपये मिळतात यामुळें या भागातील ग्रामीण भागाला पूर्णपणे आर्थिक सुबत्ता मिळाली आहे

**सहकारी साखर कारखान्यांमुळे हजारो शेतकऱ्यांना रोजगार**

मांजरा परिवारातील साखर उद्योग सुरू झाले आज जवळपास जिल्हाभरात या साखर कारखान्याच्या माध्यमातून जवळपास १० हजार लोकांना रोजगार मिळत आहे तर यामुळे ज्या भागात साखर उद्योग उभा आहे तिथं बाजारपेठ वाढली छोटे मोठे व्यापार वाढला लोकांकडे पैसा आला तोच पैसा स्थानीक बाजारात फिरत आहे आर्थिक मदत होत आहे

**स्वयंरोजगारासाठी जिल्हा बँकेकडून मदत**

राज्यात जिल्हा बँकांत एक क्रमांकावर असलेली लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सलग ४० वर्षापासून कार्यरत आहे या बँकेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रगती झाली आहे जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली या बँकेने शेतकऱ्यांच्या मुलांना १०४ कोटी रुपये कर्ज वाटप हार्वे स्टर साठी केले त्यातून आज जिल्हाभरात ३ हजारापेक्षा अधिक उद्योजक बनवले बँकेमुळे जिल्हाभरात ५ हजार लोकांना रोजगार मिळत आहे तर स्वतः उद्योजक तयार केले आहेत तर या बँकेकडून शेतकऱ्यांना पीककर्ज पाच लाख रुपये पर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येते ही पाच लाख रुपये बिनव्याजी देणारी लातूर बँक ही देशातील पहिली बँक ठरलेली आहे

**पारदर्शकता सूक्ष्म नियोजन**

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब ज्या संस्थेत असतात त्या संस्था अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य करत असतात चुकीची कुठलीही गोष्ट चालत नाही संस्थावर स्वतः साहेब यांचं लक्ष असते आपल्या संस्था चांगल्या व पारदर्शकता आणण्यासाठी सतत प्रयत्न असतात त्यामुळें अनेक संस्था पूर्णपणे फायद्यात चालतात ऊस उत्पादक शेतकर्याना एफ आर पी पेक्षा अधिक भाव देण्याचा विक्रम याच मांजरा परिवारातील संस्थांनी केला आहे मराठवाडा विदर्भात सर्वाधिक ऊसाचे गाळप व सर्वाधिक योग्य भाव याच परिवाराच्या नावावर आहे

**सहकारातून समृद्धीचा मंत्र**

७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचे सहकारातील योगदान हे आजच्या आणि उद्याच्या पिढींसाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. त्यांनी दाखवलेली दिशा ही केवळ संस्था उभारण्याची नव्हे, तर माणसं घडवण्याची आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्ष व वाढदिवसा निमित्त खूप खूप शुभेच्छा अशीच जनसेवा पुढील काळात साहेब यांच्या कडून राहावी तसेच निरोगी आयुष्य जगावे अशी इश्वरचरणी प्रार्थना करतो

-------

**हरीराम कुलकर्णी**
**ज्येष्ठ पत्रकार लातूर**
**९९७००८१०७७**

# प्रभावशाली व पथदर्शी व्यक्तीमत्व ; सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख साहेब

सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब हे नावं अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. ते माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब यांचे धाकटे बंधू आहेत. राज्याच्या मंत्रिमंडळात दोन वेळा मंत्रीपदी राहिलेले, अनुभवी, उत्तम प्रशासक,कृषी आणि सहकार क्षेत्रात भरीव योगदान देणारे आणि राज्यभर नावलौकिक असलेले, राष्ट्रीय काँग्रेस विचारधारेने परिपक्व असलेले, ज्येष्ठ, उमदे व प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणजे सहकारमहर्षी मा.दिलीपराव देशमुख साहेब!

दिलीपराव साहेबांचा जन्म लातूर जिल्ह्यातील बाभळगाव या गावी १८ एप्रिल १९५० साली झाला. साहेबांनी लातूर येथे उच्च शिक्षण घेतले. स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब व मा. दिलीपराव देशमुख साहेब यांचे राजकारणात पदार्पण एकाच वेळी बाभळगावच्या ग्रामपंचायत निवडणुकीतून झाले होते. राज्याच्या राजकारणात, सहकार क्षेत्रात आणि समाजकारणात गेल्या ५० वर्षांपासून सक्रिय असलेले आणि आपल्या कार्यातून विशेष छाप सोडणारे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री, साखर उद्योग क्षेत्रातील जाणकार सहकारमहर्षी मा.दिलीपराव देशमुख यांचा आज ७६ वा वाढदिवस आहे.

मा.दिलीपराव देशमुख साहेब हे तीन टर्म विधान परिषदेत सदस्य राहीलेले आहेत. त्यांना दोन वेळा महाराष्ट्र मंत्रीमंडळात संधी मिळाली आहे. मा.अशोकराव चव्हाण साहेब यांच्या काळात त्यांनी पुर्नवसन, क्रीडा व युवक कल्याण कैबिनेट मंत्री म्हणुन काम केले तसेच मा. सुशीलकुमार शिंदे साहेब यांच्या काळात वित्त व नियोजन राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये उपाध्यक्ष या पदी त्यांनी यशस्वी काम केले. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्ष कार्य केले आहे मा.साहेबांनी विविध पदांवर कार्य करताना आपल्या अनुभवातून कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

स्वर्गीय विलासरावजी देशमुख साहेब आणि सहकारमहर्षी मा.दिलीपरावजी देशमुख साहेब या दोन्ही बंधूंनी लातूर जिल्ह्याचा कायापालट केला. पुर्वी मांजरा नदीलगतचा भाग सोडाला तर अन्य ठिकाणी पाण्याची खुप भीषण टंचाई होती. अनेक गावातील लोक विविध ठिकाणी स्थलांतर करीत होते. ग्रामीण लोकांच्या जीवनात परिवर्तन करायचे असेल तर त्यांना पिण्यासाठी व शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध केले पाहीजे म्हणुन स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब व मा.दिलीपराव देशमुख साहेब यांच्या प्रेरणेतून अनेक गावात छोटे मोठे धरणे, बंधारे, नदीवर किटवेयर तयार केले. पुर्वी अनेक खेड्यात कोणत्याही सुविधा नव्हत्या. स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब राजकारणात उच्च पदावर आरूढ होताच विकासापासून वंचित असलेल्या ठिकाणी अनेक विकास कामे केली. शहरा बरोबरच खेड्यातील लोकांना श्रवाश्रवत पाणी, मुबलक वीज, चांगले रस्ते उपलब्ध करून दिले. त्यामुळे खेड्यापाड्यातील शेती सुधारली, तेथील लोकांचे जीवनमान सुधारले. अनेक ठिकाणी सहकारी व खाजगी कारखाने काढले. त्यामुळे बेरोजगारांना नोकरीची संधी मिळाली व शेतकरी नगदी पीक म्हणून ऊस उत्पादनाकडे वळले. ऊस पिकाच्या माध्यमातून चांगला हमीभाव मिळण्याची खात्री झाली. योग्य भाव मिळाल्याने लोकांच्या जीवनात परिवर्तन झाले. हळुहळु मातीच्या घरांचे रूपांतर बंगल्यात झाले.

**कैवारी तुम्ही,**
**गोर-गरीबांचे, दिनदुबळ्यांचे**
**कष्टकऱ्यांचे,शेतकऱ्यांचे**
**सर्व समाजाचे !**

**पक्षधर तुम्ही,**
**माणुसकीचे, सत्याचे,**
**न्यायाचे, आशेचे**
**सर्वांच्या भविष्यांचे !**

**दीपस्तंभ तुम्ही,**
**सहकाराचे, अर्थकारणाचे**
**विचारधारेचे, राजकारणाचे**
**सर्व नातेसंबंधाचे !**

स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब व मा. दिलीपराव देशमुख साहेबांनी गाव खेड्यातील मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट,लातूर शैक्षणिक संस्था व दयानंद शिक्षण संस्था बाभळगाव च्या माध्यमातून अनेक शाळा,महाविद्यालय सुरू केले व त्यातून उत्तमरित्या शिक्षण देण्याचे कार्य चालू आहे. त्याचबरोबर आपल्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी शिक्षण संस्था स्थापन करण्यास प्रेरित केले. फक्त लातूर पुरत्या शैक्षणिक संस्था काढल्या असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी साहेबांच्या कार्यकर्त्यांनी शैक्षणिक संकुले तयार करून शिक्षणाची ज्ञानगंगा तळागळातील व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविली आहे.

सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील मांजरा साखर परिवारातील साखर कारखाने सुरू असल्याने मोठ्या प्रमाणावर गेल्या २५ वर्षांत बदल झालेला दिसून येतो.उस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव देणाऱ्या यादीत राज्यातील आघाडीवर असलेल्या पहिल्या पाच साखर कारखान्यांत मांजरा साखर परिवाराचे नाव आहे. जिह्यात मागच्या ३०ते ३५ वर्षांत मांजरा साखर परिवारातील अनेक साखर कारखाने सुरू झाले. पूर्वी मांजरा साखर कारखाना होता त्यांनतर विस्तार वाढत गेल्याने पुढे रेणा, विलास, जागृती, मारुती महाराज, विलास-२, ट्वेन्टी ट्वेन्टी १ व २ असे अनेक साखर कारखाने उभारले आहेत. 'उत्कृष्ट नियोजन व रास्त हमीभाव' यामुळे सर्व कारखाने सहकार क्षेत्रात रोल मॉडेल ठरत आहेत व शेतकऱ्यांचे हित जोपासणारे देखील आहेत. स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रेरणेतून व मा. दिलीपराव देशमुख साहेबांच्या मार्गदर्शनाखाली अमित भैय्या व धीरज भैय्या हे दोघेही उत्तम प्रकारे कार्य करीत आहेत. माजी मंत्री,आमदार अमित विलासरावजी देशमुख साहेब हे महाराष्ट्राचे भावी नेतृत्व म्हणून समोर येत आहेत. जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज विलासरावजी देशमुख अतिशय उमदे, तरूण व युवकांचे प्रेरणास्थान आहेत

सहकार क्षेत्रातील अनेक जिल्हा बँक तोट्यात आहेत व अनेक कारखान्यावर कर्जाचा डोंगर असताना लातूर जिल्हा मात्र याला अपवाद आहे. लातूर येथील सहकार क्षेत्र एका विशिष्ट उंचीवर नेऊन महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम स्वर्गीय विलासराव साहेब व मा. दिलीपराव साहेबांनी केले आहे. ग्रामीण भागातील अर्थवाहिनी व कृषी क्षेत्राला चालना देणारी बँक म्हणून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ओळखली



जाते. शेतकऱ्यांना सहजपणे कर्ज पुरवठा करुन सभासदांना वेगवेगळ्या योजना राबवून बिनव्याजी कर्ज देते. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचे काम या नेतृत्वाने केले आहे. कृषी, सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ म्हणून सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा उल्लेख करावा लागेल.

माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख, जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज विलासरावजी देशमुख आहे. हे स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रेरणेतून व सहकारमहर्षी मा.दिलीपराव देशमुख साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम कार्य करीत आहेत. चांगल्या माणसाची पारख करण्याची दृष्टी मा.दिलीपराव देशमुख साहेबांना आहे. सर्व समाजातील विविध जाती धर्मांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन सर्वसमावेशक विकास साधण्याचा प्रयत्न देशमुख परिवार नेहमी करत आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब व मा.दिलीपराव देशमुख साहेब यांचे राजकारणातील संस्कार म्हणजे कधीच कोणत्याही नेत्या विरूध्द खालच्या पातळीवर जाऊन टिका टिप्पणी केली जात नाही. फक्त निवडणूकी पुरते राजकारण आणि कोणत्या ही नेत्यांना वैयक्तिक पातळीवर न बोलता राजकारण करण्याचा हा सुद्धा एक लातूर पॅटर्न आहे. त्यामुळे कांग्रेस पक्षा व्यतिरिक्त अनेक पक्षातील नेत्यांसोबत देशमुख परिवाराचे चांगले संबंध आहेत. म्हणूनच कार्यकर्त्यांना देखील योग्य संस्कार मिळाले आहेत. त्यामुळेच आज लातूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात समतोल विकास पहावयास मिळतो आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांचे विकासाचे व्हीजन ज्यांना समजले होते, त्यातील पहिले नेते म्हणजे दिलीपरावजी. नुसतं समजून भागत नाही, त्या मार्गावर उत्तमरित्या चालता आले पाहीजे हि भूमिका ठेऊन स्वर्गीय. विलासरावजींचे स्वप्न पूर्ण करताना, त्यांची धोरणे तंतोतंत राबवणारे नेतृत्व म्हणजे सहकारमहर्षी मा.दिलीपराव देशमुख साहेब! आज अश्या उत्तुंग व व्यापक दुरदृष्टि असलेल्या नेतृत्वाचा आज जन्मदिवस आहे. त्यामुळे साहेबांना वाढदिवसाच्या अनेकानेक शुभेच्छा देतो व त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी ईश्र्वरचरणी प्रार्थना करतो !

**लेखक**
**प्रा.डॉ.ज्ञानेश्वर देशमुख**
**– श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय लातूर मो. ९७६५२५३३७५**

# सहकारातील 'धिरोदात्त' दीपस्तंभ: सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख



एखादी नदी आपल्या उगमापासून प्रवाहित होताना जशी केवळ स्वतः वाहत नाही, तर आपल्या दोन्ही काठांवरील जीवन समृद्ध करत जाते, अगदी तसेच व्यक्तिमत्व म्हणजे सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख. महाराष्ट्राच्या आणि विशेषतः लातूरच्या सार्वजनिक जीवनात गेल्या चार दशकांपासून ध्येयनिष्ठेचा प्रवाह अखंड ठेवणारे दिलीपरावजी आज अनेकांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरले आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या अष्टपैलू प्रवासाचा आढावा घेणे, म्हणजे एका 'विधायक नेतृत्वाच्या संस्कृती'चा अभ्यास करण्यासारखे आहे.

माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सुसंस्कृतता. राजकारणात असूनही त्यांनी आपली शालीनता कधीही सोडली नाही. त्यांचे नेतृत्वगुण सुसंस्कृत, शिस्तप्रिय आणि अभ्यासू असे आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनातली टापटीप, वेळेचे काटेकोर नियोजन आणि कामातील अचूकता हे त्यांच्या नेतृत्वाचे मूळ वैशिष्ट्य आहे. सार्वजनिक जीवनात वावरणारा नेता अनेकदा गोंधळात हरवतो; पण दिलीपरावजींच्या बाबतीत उलट चित्र दिसते-ते जितके मोठे पद भूषवतात, तितकेच साधेपणाने वागतात.

त्यांचा एक महत्त्वाचा विचार म्हणजे-राजकारण हे जीवनाचे सर्वस्व नाही; ते समाजकारणाचे साधन आहे. हा विचार केवळ भाषणात नाही, तर त्यांच्या कृतीत दिसतो. त्यांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले आणि कार्यकर्त्यांनाही तसाच दृष्टिकोन दिला.

दिलीपरावजींना सर्व स्तरातील लोक आपला नेता का मानतात? याचे उत्तर त्यांच्या 'माणूसपण' जपण्याच्या शैलीत आहे. त्यांच्याकडे अफाट स्मरणशक्ती आहे; एकदा भेटलेल्या सामान्य कार्यकर्त्यालाही ते अनेक वर्षांनंतर नावाने हाक मारतात, तेव्हा त्या कार्यकर्त्याला मिळणारा सन्मान शब्दांपलीकडचा असतो. उच्चशिक्षित अधिकारी असो वा शेतात राबणारा शेतकरी, सर्वांशी त्यांचा संवाद तितकाच जिव्हाळ्याचा असतो. ही 'चुंबकीय शक्ती' त्यांनी स्वतःच्या वागण्यातून आणि माणुसकीतून कमावली आहे.

लातूर जिल्हा परिषद असो, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असो वा विधानपरीषद असो दिलीपरावजींनी जिथे जिथे काम केले, तिथे तिथे रचनात्मक बदल घडवून आणले. एकेकाळी राज्यात २७ व्या क्रमांकावर असलेली लातूर जिल्हा परिषद त्यांच्या कार्यकाळात राज्यात प्रथम क्रमांकावर आली, हे त्यांच्या प्रशासकीय कौशल्याचे जिवंत उदाहरण आहे.

लोकप्रतिनिधी + प्रशासन = सकारात्मक समन्वय हे त्यांचे सूत्र आजही आदर्श मानले जाते. ते केवळ योजना आखत नाहीत, तर त्या शंभर टक्के पारदर्शकतेने कशा राबवल्या जातील, याकडे त्यांचा कटाक्ष असतो.

लातूरसारख्या मागास भागात आर्थिक क्रांती घडवून आणण्यात दिलीपरावजींचे योगदान 'भीमपराक्रमी' आहे. मांजरा, रेणा, विकास आणि जागृती या साखर कारखान्यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेत साखरेचा गोडवा पेरला. शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करून त्यांना सन्मानाने उभे करण्याचे काम त्यांनी केले. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराला आणि अपप्रवृत्तींना वेसन घालण्याचे धाडस त्यांनी दाखवले, म्हणूनच त्यांना 'सहकार महर्षी' ही पदवी सार्थ ठरली आहे.

साप्रत सार्वजनीक जिवनात जिथे 'श्रेय' घेण्यासाठी स्पर्धा लागलेली असते, तिथे दिलीपरावजी मात्र कार्यकर्त्यांना मोठे करण्यात धन्यता मानतात. लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या अवाढव्य वटवृक्षाच्या सावलीत राहूनही त्यांनी स्वतः चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. आदरणीय विलासरावजी म्हणायचे, दिलीपराव चंदनासारखे झिजले, म्हणून आम्ही टिळा लावून महाराष्ट्रभर फिरू शकलो. हे वाक्य त्यांच्या त्यागाची आणि समर्पणाची पावती आहे.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दिलीपरावजींना मातीची ओढ आहे. ते आजही कार्यकर्त्यांना सांगतात, तुमचे पाय किमान एकदा तरी शेताला लागू द्या. त्यांच्या यशात त्यांच्या सहचारिणी सुवर्णाताई यांचा मोलाचा वाटा आहे. राजकारणातील वादळांना सामोरे जाताना घरचा आधार किती महत्त्वाचा असतो, हे त्यांच्या कौटुंबिक जीवनाकडे पाहून समजते. निसर्गप्रेम, संगीत आणि साहित्याची आवड यामुळे त्यांच्या नेतृत्वात एक प्रकारची रसिकता आणि कोमलता जाणवते.

आजच्या धावपळीच्या आणि अस्थिर राजकारणात दिलीपरावजींचे विचार दिशादर्शक आहेत. त्यांनी दाखवून दिले की, आरडाओरडा न करताही शांतपणे मोठे बदल घडवता येतात. आजची पिढी अनेक आव्हानांना सामोरी जात आहे- स्पर्धा, अस्थिरता, मूल्यांची घसरण. अशा वेळी दिलीपरावजी देशमुख यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतात. सहकार, उद्योग किंवा समाजकारणात पाय ठेवणाऱ्या तरुण पिढीसाठी त्यांचे 'लातूर मॉडेल' हा एक अभ्यासाचा विषय आहे. त्यांनी दाखवून दिले की, योग्य नियोजन, प्रामाणिक प्रयत्न आणि सामाजिक बांधिलकी यामुळे कोणतेही ध्येय साध्य करता येते.

दिलीपरावजी देशमुख म्हणजे केवळ एक नाव नाही, तर ती एक 'कार्यसंस्कृती' आहे. ज्यांनी लातूरच्या मातीवर प्रेम केले आणि त्या मातीतून सोन्यासारखी माणसे आणि संस्था निर्माण केल्या. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या कार्याचा हा वारसा असाच वृद्धिंगत होत राहो, हीच सदिच्छा!



**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**रा.करकट्टा ता.जि.लातूर मो.९८९०५७७१२८**

# राष्ट्रवादी क्रांतिकारक – अवध बिहारी

गाऊ त्यांना आरती , शिरीष चिटणीस

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा मोठ्या नेत्यांच्या राजकीय रणनीतीपासून ते भूमिगत क्रांतिकारकांच्या धाडसी कृत्यांपर्यंत पसरलेला आहे. याच इतिहासात अवध बिहारी यांचे नाव शहीदाच्या रूपात उजळले आहे. अवध बिहारी हे शिक्षक, राष्ट्रवादी क्रांतिकारक होते, ज्यांनी उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये क्रांतिकारी जाळे तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अवध बिहारी हे सशस्त्र क्रांतीच्या वैचारिक आणि व्यावहारिक संघर्षाचे प्रतीक आहे. ८ मे १९१५ रोजी सकाळी ८ वाजता दिल्ली तुरुंगाच्या फाशी घरात अवध बिहारी, मास्टर अमीरचंद आणि भाई बालमुकुंद यांना एकाच वेळी फाशी देण्यात आली. दिल्ली–लाहोर कट खटल्यात या तिघांना व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंगवर २३ डिसेंबर १९१२ रोजी केलेला बॉम्ब हल्ला आणि लाहोरच्या लॉरेन्स गार्डन या ठिकाणी १७ मे १९१३ रोजीच्या बॉम्ब हल्ल्यातील सहभाग असल्यामुळे मृत्युदंड ठोठावण्यात आला होता.

त्या काळात दिल्लीचा सेंट्रल जेल (आज मौलाना आजाद मेडिकल कॉलेज परिसर) हा क्रांतिकारकांसाठी मृत्यूचा साक्षीदार बनला होता. फाशीच्या आधीच्या रात्री तिघेही क्रांतिकारक शांतपणे स्वीकारार्ह वृत्तीने राहिले. २६ वर्षीय अवध बिहारी यांनी तुरुंगातील शेवटचे क्षण प्रार्थना आणि देशभक्तीच्या घोषणांसह घालवले. सकाळी ७:३० वाजता त्यांना फाशी घराकडे नेले गेले. ब्रिटिश अधिकार्यांनी सर्व प्रक्रिया जलदगतीने पार पाडली, कारण त्यांना भीती होती, की या फाशीमुळे देशभरात असंतोष उफाळेल. फाशीच्या दांडीवर चढताना अवध बिहारींनी ठामपणे 'भारत माता की जय' आणि 'इंकलाब जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या. त्यांच्या शेवटच्या शब्दांतूनच त्यांचा निर्धार आणि धैर्य दिसून येते.फाशीची प्रक्रिया पारंपरिक पद्धतीने पार पडली. दोरीचा फास त्यांच्या गळ्यात घातला गेला. खालून खुर्ची खेचून घेतली गेली. तिघेही एकाच क्षणी शहीद झाले. ब्रिटिशांनी मृतदेह कुटुंबीयांपर्यंत पोहोचवले नाहीत; त्यांचा गुपचुपपणे दफनविधी आटोपण्यात आला. ही घटना केवळ कायदेशीर शिक्षा नव्हती, तर ब्रिटिशांची क्रांतिकारकांना संपविण्याची धोका धारण करणारी रणनीती होती; पण या फाशीने उलट स्वातंत्र्यलढ्याला प्रचंड नैतिक बळ मिळाले. अवध बिहारींच्या शहादतीने तरुण पिढीला सशस्त्र प्रतिकाराची प्रेरणा दिली आणि गदर चळवळ, काकोरी कांड यांना आधार दिला.

लोकमान्यांकडून प्रेरणा

लोकमान्य टिळक हे १९१० च्या दशकातील क्रांतिकारकांसाठी वैचारिक आधारस्तंभ होते. त्यांनी थेट सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व केले नाही; पण त्यांच्या केसरी आणि मराठातील लेखनाने, सार्वजनिक भाषणांतून आणि स्वराज्याच्या मागणीतून ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्भय वातावरण घडवले. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी ते घेईनच ही घोषणा तरुण क्रांतिकारकांसाठी लढ्याची ललकार बनली. १९०८ च्या मुजफ्फरपूर बॉम्बकांडात प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोस यांच्या कृतींचे टिळकांनी उघड समर्थन केले, त्यामुळे त्यांना सहा वर्षांची मंडाले कैद झाली. टिळक तुरुंगात होते तरी त्यांच्या प्रेरणेने ब्रिटिश भारतामध्ये जहाल क्रांतिकारकांचा भारताच्या स्वातंत्र्यासाठीचा लढा तीव्र बनला होता. १९१४ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर लोकमान्य टिळक यांनी होमरूल लीग स्थापन केली आणि गणेशोत्सव, शिवजयंतीद्वारे जनजागृती केली. टिळकांचा क्रांतिकारकांवरील प्रभाव हा अप्रत्यक्ष पण खोलवर होता. त्यांनी दाखवून दिले, की ब्रिटिशांविरुद्ध बोलणे म्हणजे देशद्रोह नाही, तर तो आमचा स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यामुळे अवध बिहारींसारख्या कार्यकर्त्यांना त्यांची भूमिका नैतिकदृष्ट्या वैध वाटली. टिळकांनी जनमानसात असंतोषाची ठिणगी पेटवली आणि त्या ठिणगीने क्रांतिकारकांच्या कृतींना ज्वाला दिली. दिल्ली–लाहोर षडयंत्रातील क्रांतिकारकांना भारताच्या स्वातंत्र्यासाठी लोकमान्य टिळक भोगत असलेला तुरुंगवास प्रेरणादायी ठरला.

अवध बिहारी यांचा जन्म १८८९ मध्ये दिल्लीत एका साधारण कुटुंबात झाला. त्यांचे वडील गोविंदलाल हे छोटेखात्याचे काम करणारे होते, आणि कुटुंब ब्राह्मण होते. बालपणापासूनच त्यांना




शिक्षणाची आवड होती. ते दिल्लीतील शाळेत उत्तम विद्यार्थी होते. पदवीपूर्व शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अध्यापनाचा पेशा स्वीकारला. त्या काळात शिक्षक अवध बिहारी यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक आणि राजकीय जागृती देण्याचे कार्य केले. अवध बिहारींनी आपल्या विद्यार्थ्यांना स्वदेशी वस्तूंचा वापर, ब्रिटिश राजवटीचे दोष आणि स्वराज्याची गरज याविषयी शिकवले. त्यांचे कुटुंब पारंपरिक होते, पण अवध बिहारींनी घरची परिस्थिती सोडून राष्ट्रसेवेला प्राधान्य दिले. १९०५ मध्ये झालेल्या बंगाल फाळणीनंतर सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीने त्यांना प्रभावित केले. दिल्लीत स्वदेशी दुकान सुरू करून त्यांनी देशी वस्तूंचा प्रसार केला. याच काळात लाला हरदयाळ यांच्याशी त्यांचा संपर्क झाला, ज्याने त्यांना गदर पक्षाच्या विचारांकडे नेले. हरदयाळ हे अमेरिकेतून परतलेले क्रांतिकारी होते आणि त्यांच्या प्रभावाने अवध बिहारींचा स्वातंत्र्य लढ्याकडे कल अधिक तीव्र झाला.

मिरवणुकीवर बॉम्बफेक

रासबिहारी बोस यांच्याशी अवध बिहारींचे जवळचे संबंध होते. रासबिहारी हे बंगालमधील अनुशीलन समितीचे नेते होते. त्यांनी उत्तर भारतात क्रांतिकारी जाळे विस्तारले. अवध बिहारींनी दिल्लीत गुप्त बैठका आयोजित केल्या, क्रांतिकारी साहित्य छापले आणि वाटप केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि युवकांना सशस्त्र क्रांतीसाठी प्रेरित केले. त्यामुळे ते दिल्ली कटातील महत्त्वाच्या दुव्यांपैकी एक ठरले. लॉर्ड हार्डिंगवर बॉम्बहल्ला हा अवध बिहारींच्या कारकीर्दीचा केंद्रबिंदू होता. १९११ मध्ये कोलकात्याहून दिल्लीला राजधानी हलवण्याचे ब्रिटिशांनी जाहीर केल्यानंतर भव्य उद्घाटन सोहळा आयोजित केला. चांदनी चौकातून हत्तीवर बसलेल्या व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंगच्या मिरवणुकीवर बसंत कुमार बिस्वास या स्वातंत्र्यवीराने महिलांसाठी राखीव असलेल्या ठिकाणी बुरख्यासह स्त्री वेश धारण करून लपून लॉर्ड हार्डिंग याच्या अभिवादन स्वीकारत असलेल्या हत्तीवर बॉम्ब फेकला. हार्डिंग जखमी आणि सहकारी ठार झाला. थोडक्यात हार्डिंग बचावला. मिरवणूक या हल्ल्याने उधळली आणि बसंत कुमार बिस्वास या गर्दीत ब्रिटिश पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाले. अवध बिहारींनी या बॉम्ब हल्ल्याच्या कटाच्या तयारीत साहित्य पुरवठा, कार्यकर्ते एकत्र करणे आणि पोलिसांना चुकवण्यात मदत केली.

हल्ल्यानंतर ब्रिटिशांनी १०,००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले आणि तपास तीव्र केला. १७ मे १९१३ रोजी लाहोरच्या लॉरेन्स गार्डनमध्ये दुसरा हल्ला झाला, ज्यामुळे षडयंत्राची व्याप्ती वाढली. फेब्रुवारी १९१४ मध्ये अवध बिहारींना आणि इतर सहकारी क्रांतिकारकांना दोन्ही बॉम्ब हल्ल्यातील सहभागाबद्दल अटक झाली. त्यांच्यावर हार्डिंग आणि लॉरेन्स हल्ल्यांचा सहभाग असल्याचा आरोप ठेवण्यात आला. दिल्ली खटला २३ मे १९१४ रोजी सुरू झाला. ब्रिटिश न्यायव्यवस्था राजकीय हत्यार बनली; पुरावे जप्त साहित्य, पत्रे आणि सहकार्यांच्या कबुल्यांवर आधारित होते.

खटल्यात अवध बिहारींनी धैर्याने उत्तर दिले. त्यांनी ब्रिटिश न्यायाला साम्राज्यवादी साधन म्हटले, तसेच राजकीय हत्यारे म्हटले. खटला २३ मे १८१४ रोजी चालू झाला आणि ५ ऑक्टोबर १९१४ रोजी मृत्युदंड ठोठावला गेला. तुरुंगात त्यांनी शांतपणे दिवस घालवले, देशभक्तीच्या कविता लिहिल्या आणि सहकार्यांना प्रोत्साहन दिले. फाशीच्या दिवशी त्यांनी शेवटचे प्रवचन दिले आणि ते फासावर चढले.

होमरूल चळवळ

टिळकांचा प्रभाव अवध बिहारींच्या जीवनावर होता. टिळकांनी निर्माण केलेल्या वातावरणामुळे क्रांतिकारकांना वैधता मिळाली. टिळकांच्या होमरूल चळवळीने जनजागृती केली आणि अवध बिहारीसारख्या क्रांतिकारकांनी त्या जागृतीला कृती दिली. टिळकांचे स्वराज्याचा हक्क हे घोषणापत्र अवध बिहारींसारख्या तरुणांसाठी लढ्याचे ध्येय बनले. टिळकांनी जनमानस घडवला, क्रांतिकारकांनी तो कृतीत उतरवला.

अवध बिहारींचे शैक्षणिक योगदान मोठे होते. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशी, स्वराज्य आणि ब्रिटिश राजवटीचे दोष शिकवले. त्यांच्या शाळेत राष्ट्रवादी चर्चा होत्या आणि विद्यार्थी स्वदेशी दुकानांमध्ये स्वयंसेवक बनले. त्यांनी शिक्षणाला क्रांतीचे साधन बनवले. त्यांचे कुटुंब साधे होते; पण त्यांनी घर सोडून राष्ट्रसेवा केली.

अवध बिहारींचा प्रवास हा शिक्षकापासून शहीदापर्यंतचा आहे. त्यांनी स्वदेशी चळवळीत प्रवेश केला, रासबिहारी बोस यांच्याशी जोडले गेले, हार्डिंग हल्ल्यात सहभाग घेतला, अटक झाल्यानंतर धैर्याने खटला लढला आणि शहादत पत्करली. टिळकांचा प्रभाव या प्रवासाला वैचारिक आधार देत राहिला. टिळकांनी दाखवले, की बोलणे म्हणजे कमकुवतपणा नाही, तर शस्त्रास्त्रे उगारणे म्हणजे खरा प्रतिकार आहे. त्यांच्या शहादतीने क्रांतिकारक चळवळीला नवे बळ मिळाले. गदर चळवळ, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांना प्रेरणा मिळाली. अवध बिहारी हे अनसंग हीरो असले तरी त्यांचे बलिदान स्वातंत्र्यलढ्याचा अविभाज्य भाग आहे. अवध बिहारी हे १९१० च्या दशकातील स्वातंत्र्यलढ्याचे विचारी क्रांतिकारी नेतृत्व होते. त्यांच्या क्रांतिकारी योगदानाने भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक व्यापक आणि शक्तिशाली बनला.

---

## फ्रिजचे थंड पाणी आरोग्यासाठी खरंच घातक आहे का?

उन्हाळ्यातील त्वचेची काळजी घेण्यासाठी हे अप्रतिम फेस पॅक घरच्या घरी बनवा उन्हाळा सुरू झाला! उष्माघातापासून वाचण्यासाठी आजपासून या ७ सवयी लावा उन्हाळ्यात कपड्यांची काळजी कशी घ्यावी अंगणातील तुळ–शीचे रोप वाळू लागले का? उन्हाळ्याच्या हंगामात बहरत राहण्यासाठी या टिप्स अवलंबवा ४०अंश सेल्सिअस तापमानात बाहेर पडताना काय काळजी घ्यावी? डॉक्टरांचा सल्ला ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात बाहेर पडणे उष्माघात (हीट स्ट्रोक) आणि उष्मा थकवा (हीट एक्झॉस्टियन) चा धोका वाढवते. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी निर्जलीकरण टाळणे आणि उन्हाचा थेट संपर्क कमी करणे अत्यंत गरजेचे आहे.१. बाहेर पडण्यापूर्वीची तयारी

दुपारी १० ते ४ (किंवा ११ ते ३) दरम्यान शक्यतो बाहेर जाणे टाळा. सकाळी लवकर किंवा सूर्यास्तानंतर बाहेर पडा.

हलके, सैल, सुती आणि फिकट रंगाचे कपडे घाला (काळे किंवा गडद रंग उन्ह शोषून घेतात). पूर्ण बाजूंची शर्ट आणि पँट चांगले. रुंद कडेची टोपी किंवा छत्री वापरा.

सनस्क्रीन (सूर्यकिरण त्वचेला जाळतात आणि शरीर थंड होण्याची क्षमता कमी करतात).

सनग्लासेस घाला.घराबाहेर पडण्यापूर्वी भरपूर पाणी प्या. बाटली सोबत ठेवा. २. बाहेर असताना काय करावे?तहान लागली नसली तरी दर १५–२० मिनिटांनी पाणी प्या. एकूण दिवसभरात ३–४ लिटर किंवा त्यापेक्षा जास्त (शरीर आणि कामानुसार).लिंबू सरबत, नारळ पाणी, जठड (ओरल रिहायड्रेशन सॉल्ट), ताक किंवा इलेक्ट्रोलाइट्स असलेले पेय घ्या.

चहा, कॉफी, अल्कोहोल आणि गोड पेये टाळा – ते निर्जलीकरण वाढवतात.

थकवा जाणवल्यास सावलीत किंवा थंड जागी बसून आराम करा. काम हळू करा.

हलके, सहज पचणारे अन्न खा (फळे, सॅलड, दही). तळलेले, मसालेदार किंवा जड जेवण टाळा.थंड पाण्यात भिजवलेला रुमाल गळ्यावर, डोक्यावर किंवा हातांवर ठेवा.

३. उष्मा थकव्याची लक्षणे – लगेच सावध व्हा!जास्त घाम येणे, थंड आणि ओली त्वचा डोकेदुखी, चक्कर, अशक्तपणा, मळमळ, उलटी स्नायू दुखणे किंवा आकुंचन पडणे

वेगवान आणि कमकुवत नाडी

उपाय: तात्काळ सावलीत/थंड जागी जा, कपडे सैल करा, थंड पाणी प्या, अंगावर थंड पाणी मारून फॅन करा. सुधारणा न झाल्यास डॉक्टरांकडे जा.४. उष्माघात – आणीबाणी!

शरीराचे तापमान ४०अंश सेल्सिअस पेक्षा जास्तघाम येणे बंद होणे, गरम आणि कोरडी त्वचा

गोंधळ, बेशुद्ध पडणे, वेगवान श्वास/नाडी

डोकेदुखी, झटके काय करावे?

तात्काळ रुग्णालयात न्या.

रुग्णाला थंड जागी न्या, कपडे काढा, थंड पाण्याने अंग पुसा/आंघोळ घाला. तोंडाने पाणी देऊ नका (बेशुद्ध असल्यास).

विशेष काळजी घ्या कोणाला? लहान मुले, वृद्ध व्यक्ती हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह असणारे बाहेर काम करणारे कामगार (विक्रेते, डिलिव्हरी, ट्रॅफिक पोलिस)

गर्भवती महिला




---

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, राहणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे.

## २ Joke विनोद




गोरा रंग :

ऐश्वर्या : तुझ्या पतीचा हळूहळू गोरा रंग होत चाललाय याचे कारण काय?

काजोल : अगं, पूर्वी ते कोळशाच्या वखारीत कामाला होते. आता ते पिठाची चक्की चालवतात.

## ३ Message संदेश



Me aapko ENGLISH ka 1 word bhejta hu,
Jise aap aage se padho ya pichhe se,
aapko aapka hi naam dikhai dega,.
- U L L U

## ४ Thought सुविचार



ग्रंथापेक्षा अनुभव बरेच काही सांगून जातात. – जो हर्बर्ट

**संस्कृत सुभाषित**

**वीणा वंशश्चन्दनं चन्द्रभास – श्चन्द्राभासा**
**यौवनस्थास्तरुण्य:। नैतद्रम्यं क्षुत्पिपासातुराणां**
**सर्वारम्भास्तण्डुला प्रस्थमूला:।।**

अर्थ –भूक आणि तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाला वीणावादन,चंद्राचे शीतल चांदणे,चंदनाचा सुगंध, चंद्रासारखा चेहरा असणाऱ्या तरुणी यांचे आकर्षण वाटत नाही. मापटेभर तांदळाच्या भाताने क्षुधा शमल्यानंतरच त्याला इतर गोष्टींमध्ये स्वारस्य

---

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. शासन – पण शिक्षा नव्हे!
४. तोरा, ऐट
५. अवस्था, गेलेला
७. लुच्चा, लबाड
८. ओढणी
९. शीण
११. नाउमेद करणे
१२. वचक
१४. किरकोळ दुरुस्ती
१५. अश्व
१७. आर्द्रता
१९. श्रीरामाचा पुत्र
२१. पराभव
२२. मोठी सुई
२४. मलई
२७. रखवाली
२८. समशेर
३०. अगदी आवडलेले
३२. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन
३४. एकाग्र नजर
३५. प्रसूती सहाय्यक
३६. मुरलीधरनचा गाजलेला चेंडू
३७. चिन्ह, संकेत
३९. फुगीर, गरगरीत गोल
४१. हळू
४४. मागणारा
४६. धोका
४७. आप्त
५०. आश्रय
५१. पुरीसारखे फुगणारे
५२. टपाल
५३. पूर्वी मध्यपूर्व आशियातील प्रदेश या नावाने ओळखला जाई
५४. कर्जदार
५६. अननुभवी
५८. वायू
६०. अंग पुसण्याचे मऊ वस्त्र
६१. बाज, खाट
६२. दृष्टी
६३. पोळीचा कुरकुरीत गुजराथी अवतार
६४. धागा
६५. सागर
६६. विडा रंगवणारा एक घटक

### उभे शब्द

१. बेचव
२. हाताचा प्रहार
३. पुराणकालीन घोडागाडी
४. नुकताच आलेला
५. ढाबळ
६. धीर, बळ, उत्साह
७. आफ्रिकेत पाण्यात आढळणारा अवाढव्य प्राणी
८. बालकाला प्रथम येणारे दात
१०. सुळका
११. ओशाळलेला
१३. पाषाण
१६. डाव्या हाताने काम करणारा
१७. कंबरेत वाकलेला
१८. तुळईला आधार देणारा खांब
२०. मिरवणूक
२१. वाटसरूंसाठी केलेली पिण्याच्या पाण्याची सोय
२३. चुकीचे, अभिप्रेत नसलेले
२५. भाऊबीजेची तिथी
२६. झोपडी
२९. राख
३१. अरिष्ट
३३. मारुती
३५. मोठा चाकू
३८. केस
४०. भाकरीला हद्दपार करून जेवणात आलेला गव्हाचा पदार्थ
४२. खळगा
४३. जमीन
४५. द.म. मिरासदार–शंकर पाटील वगैरेंनी लोकप्रिय केलेला एकपात्री कलाविष्कार
४६. किल्ल्यात किंवा हवेलीत असलेली गुप्त चर्चेची जागा
४७. घोड्यांच्या पायाला ठोकलेला पत्रा
४८. मालगाडीचा डबा
४९. मेहनत
५१. सुखद थंडावा
५२. पेच, खेळी
५३अ. दसऱ्याआधीचे सलग जागरण
५४. वेदातील ोक, मुलींचे एक नाव
५५. कोनाडा
५६. रोकड
५७. रात्र
६०. संप्रदाय, विशिष्ट विचारधारा

### आडवे उत्तरे

१.सरकार ४.नक्षा ५.गत ७.पाजी ८.दुपट्टा ९.थकवा ११.खच्चीकरण १२.धाक १४.डागडुजी १५.घोडा १७.ओलावा १९.लव २१.पाडाव २२.दाभण २४.साय २७.राखण २८.तलवार ३०.मनपसंत ३२.पोहरा ३४.टक ३५.सुईण ३६.दुसरा ३७.प्रतीक ३९.टपोरा ४१.मंद ४४.याचक ४६.खतरा ४७.नातेवाईक ५०.थारा ५१.गाल ५२.डाक ५३.अरबस्तान ५४.ऋणको ५६.नवथर ५८.वात ६०.पंचा ६१.पलंग ६२.नजर ६३.खाकरा ६४.दोरा ६५.दर्या ६६.चुना

### उभे उत्तरे

१.सपक २.रट्टा ३.रथ ४.नवागत ५.गच्ची ६.तकवा ७.पाणघोडा ८.दुधाचे दात १०.कडा ११.खजील १३.शिला १६.डावखुरा १७.ओणवा १८.वासा २०.वरात २१.पाणपोई २३.भलतेसलते २५.यमद्वितीया २६.खोपट २९.रक्षा

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ५६ वी 'DRUCC' बैठक संपन्न; प्रवासी-केंद्रित विकासाच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर विभागाच्या विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती'ची (DRUCC) ५६ वी बैठक दिनांक १७.०४.२०२५ रोजी सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील 'संगम सभागृहात, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न झाली. या बैठकीला उ्ठणउउ सदस्यांचे एकूण ९ प्रतिनिधी उपस्थित होते. सोलापूर, कलबुरगि, लातूर, कुर्डुवाडी, पंढरपूर आणि जेऊर यांसारख्या सोलापूर विभागाच्या कार्यक्षेत्रातील विविध भागांमधून आलेले खासदार (MPs) आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी या बैठकीत सक्रिय सहभाग घेतला आणि आपल्या समस्या, सूचना व अभिप्राय मांडले.

प्रवाशांशी संबंधित विविध विषयांवर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीचे समन्वय वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (Sr DCM) श्री. जयदीप प्रदक्षिणे यांनी केले.

बैठकीला संबोधित करताना, विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ.



सुजीत मिश्रा यांनी सदस्यांना सोलापूर विभागातील प्रमुख विकास आणि आधुनिकीकरण कामांची माहिती दिली. यामध्ये सुरक्षेमध्ये वाढ करण्यासाठी 'कवच' प्रणालीची अंमलबजावणी, 'अमृत भारत स्थानक योजने'अंतर्गत झालेली प्रगती आणि प्रवाशांच्या सुरक्षित हालचालींसाठी 'पादचारी पुलां'चे (Foot Over Bridges) बांधकाम व सुधारणा या कामांचा समावेश होता. मालवाहतुकीला चालना देण्यासाठी 'गुड्स शेड'चे आधुनिकीकरण, रेशीम मालाच्या लोडिंगसाठीचे उपक्रम आणि पेट्रोलियम वाहतुकीसाठी 'पाकणी साइडिंग'चा विकास या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. तसेच, 'एक स्थानक एक उत्पादन' (OSOP) योजनेचा प्रचार-प्रसार, 'जन औषधी केंद्रां'चे कामकाज, पंढरपूर येथील आषाढी एकादशी उत्सवासाठी विशेष गाड्या आणि प्रवासी सुविधांबाबतची तयारी, तसेच स्थानकांवर 'दिव्यांगजन-स्नेही सुविधां'चा विस्तार याविषयीही त्यांनी सदस्यांना अवगत केले.

सर्व विकासकामे ही प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवूनच (प्रवासी-केंद्रित दृष्टिकोनातून) हाती घेतली जात आहेत, या गोष्टीचा त्यांनी पुनरुच्चार केला.

रेल्वे सेवा आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सोलापूर विभागाने केलेल्या सक्रिय प्रयत्नांचे DRUCC सदस्यांनी कौतुक केले. प्रवाशांचा आराम, सोय आणि सेवेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी प्रतिनिधींनी काही रचनात्मक सूचनाही मांडल्या. भारतीय रेल्वेच्या अंतर्गत 'DRUCC' हे एक महत्त्वाचे सल्लागार व्यासपीठ म्हणून कार्य करते; या व्यासपीठावर रेल्वे प्रशासन आणि रेल्वे वापरकर्ते एकत्र येतात आणि रेल्वे सेवा, पायाभूत सुविधा, प्रवाशांचा आराम व सेवा सुधारणांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करतात.

या बैठकीला अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (ADRM) श्री. अंशुमाली कुमार यांचा समावेश होता. तसेच वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक (Sr DOM) श्री. योगेश पाटील; वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) (Sr DEN Co) श्री. एस.एच. माळभागे; वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी (Sr DSO) श्री. जोएल मॅकेन्झी; सहायक विभागीय अभियंता (ADEN) श्री. आशिष साहू आणि सहायक वाणिज्य व्यवस्थापक (ACM) श्री. ए.के. यादव. वाणिज्य विभाग आणि मुख्य वाणिज्य निरीक्षक (CCI) मिस बेट्टी ऑगस्टीन यांच्या पथकाद्वारे 'DRUCC' ची बैठक यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.

ही बैठक सोलापूर विभागाची 'सहभागी प्रशासन' आणि अधिक चांगल्या सेवा पुरवण्यासाठी रेल्वे प्रवाशांशी व वापरकर्त्यांशी सतत संवाद साधण्याप्रती असलेली दृढ कटिबद्धता अधोरेखित करणारी ठरली.

## दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात गुरुतत्वम कार्यक्रम संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** दि. १५ एप्रिल २०२६ रोजी दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी Faculty Development Program अंतर्गत शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी गुरुतत्वम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक वैशाली देशमुख यांनी मेंटॉरशिप विषयी मार्गदर्शन केले.विद्यार्थी कसा घडला पाहिजे ,त्यात गुरू ची भूमिका किती महत्वाची आहे या विषयी आपले मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ऋतुजा देशमुख यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा..भाऊसाहेब सरवदे होते,यांनी आपल्या भाषणात विद्यार्थीहाच आपला केंद्रबिंदूआहे असे सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख,समन्वयक डॉ.सुभाष मोरे , विज्ञान महाविद्यालयाचे पर्यवेक्षिका डॉ .वाडीकर एस. पी.व पर्यवेक्षक डॉ.वरुडकर एच. ए, विज्ञान महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉ. अंगुलवार सर तसेच विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा कारंजे यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका डॉ. वाडीकर एस.पी.यांनी केले.

## रोटरी पुरस्कार म्हणजे सामाजिक कार्याची संजीवनी, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन तर्फे विविध पुरस्काराचे उत्साहात वितरण



**लातूर/प्रतिनिधी :** संपूर्ण जगामध्ये रोटरी ही पोलिओ निर्मूलन कार्यासाठी सर्वपरिचित आहे. रोटरी ही सामाजिक कार्य करणारी एक स्वयंसेवी संस्था असून यामध्ये सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या व्यक्ती सातत्याने समाजातील गरजा लक्षात घेऊन सामाजिक समस्यांवर उपाययोजना करतात आणि त्याच्या कार्याचा गौरव म्हणून रोटरी गौरव पुरस्कार, रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार, रोटरी सक्षम पुरस्कार आणि रोटरी नेशन बिल्डर अवार्ड आदि पुरस्कार देण्यात येतांत. हे पुरस्कार म्हणजे सामाजिक कार्य करण्यासाठीची संजीवनी आहे असे प्रतिपादन रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल रो.सुधीर लातूरे यांनी बोलताना व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझन तर्फे पार्थ हॉटेलच्या सभागृहामध्ये सत्कार समारंभात अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी सहाय्यक प्रांतपाल रविशंकर हिंगणे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी राजगोपाल तापडिया, अध्यक्ष डॉ.गुणवंत बिरादार आणि सचिव धनंजय राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळच्या सत्रामध्ये महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील कुस्ती प्रशिक्षण केंद्रात कुस्ती आणि ज्युदो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

त्यानंतर प्रांतपाल, सहाय्यक प्रांतपाल आणि डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी यांच्यासमवेत अध्यक्ष आणि सचिव यांची ऑफिशियल क्लब व्हिजिट संपन्न झाली. त्यानंतर क्लब असेंबली घेण्यात आली. राष्ट्रगीताने समारंभाची सुरुवात होऊन फोरवे टेस्ट डॉ.संजय गवई यांनी सर्वांना वाचून दाखविली.

पुढे बोलताना रो.सुधीर लातूरे म्हणाले की, रोटरीद्वारे ग्रामीण, शहरी आणि आदिवासी भागामध्ये स्थानिक भागातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन कार्य केले जाते असे सांगून रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजनचे कार्य प्रशंसनीय आणि प्रेरणादायी प्रशासनीय आहे याबद्दल अध्यक्ष, सचिव व इतर सर्व सदस्यांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी डॉ.रत्नाकर बेडगे आणि डॉ.घन:श्याम ताडेवाड संपादित रोटरी उमंग त्रैमासिक बुलेटीन आणि क्लब रोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

स्व.सी.ए.तेजमल बोरा यांचा पुरस्कार सतीश बोरा, डॉ.गोपीकिशन भराडीया आणि माजी प्रांतपाल डॉ. विजयभाऊ राठी यांना रोटरी गौरव पुरस्कार देण्यात आले.

वर्षा गोपाळ सोनी यांना रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार तर कमलाकर बावगे यांना रोटरी सक्षम पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रो.डॉ.दीपक चाटे, प्रा.विजयकुमार मांदळे, प्रा.नितीन माशाळकर, केसरी भोजने आणि बस्वराज स्वामी यांना नेशन बिल्डर अवार्डने सन्मानित करण्यात आले. सर्व पुरस्कार विजेत्याना स्मृतीचिन्ह, भेटवस्तू, प्रमाणपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सहपरिवार गौरविण्यात आले. यावेळी सहाय्यक प्रांतपाल रविशंकर हिंगणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. स्वागतपर मनोगत डॉ.गुणवंत बिरादार यांनी तर सेक्रेटरी रिपोर्ट आणि आभार धनंजय राऊत यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय गवई यांनी केले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब लातूर होरायझन मधील सर्व सदस्य आणि कुटुंबीय, पुरस्कारार्थी आणि कुटुंबीय, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवापूर एमआयडीसीत वनविभागाचा मोठा दणका; बिबट्याच्या कातडीसह पाच तस्कर गजाआड!

नवापूर : नवापूर एमआयडीसी परिसरात बिबट्या या संरक्षित वन्यप्राण्याच्या कातडीची तस्करी करणाऱ्या टोळीचा वनविभागाने पर्दाफाश केला आहे. 'वाइल्ड लाइफ क्राइम कंट्रोल ब्युरो' (मुंबई) आणि स्थानिक वनविभागाच्या संयुक्त पथकाने केलेल्या या धडक कारवाईत पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून बिबट्याची कातडी आणि चार वाहने जप्त करण्यात आली आहेत.

गुप्त माहितीच्या आधारे लावला सापळा

## जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची रविवारी निघणार भव्य शोभा यात्रा

### भरगच्च कार्यक्रम,जोरदार तयारी : मोठया संख्येने सहभागी होण्याचे महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जगतज्योती महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जयंतीची जोरदार तयारी सुरू आहे.आझाद चोक येथून रविवारी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य शोभा यात्रा निघणार आहे.

जयंती निमित्त शहरात भरगच्च कार्यक्रम पार पडणार असून त्यामध्ये शनिवार दि.१८ एप्रिल रोजी रात्री ०७:३० वाजता महात्मा बसवेश्वर चौक रिंगरोड येथील बसवेश्वरांच्या अश्वारूढ पुतळा समोर उभारण्यात आलेल्या इलईडी नामफलक बोर्डाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याच ठिकाणी लागलीच भव्य अशी आगळी-वेगळी अतिषबाजी करण्यात येणार आहे.मध्यरात्री महात्मा बसवेश्वर कॉलेज समोरील महात्मा बसेश्वरांच्या पुतळ्यास गवळी समाजाच्या वतीने दुग्धभिषेक होईल.रविवार दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ठीक ८ वाजता महात्मा बसवेश्वर चौक रिंगरोड येथे आपणां सर्वांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात येणार आहे.



श्री पाचशेघर मठ येथे दुपारी १२:०५ वाजता बसव जन्मोत्सव पाळणा होईल.रविवारी सायंकाळी ५ वाजता महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेची आझाद चौक ते महात्मा बसवेश्वर कॉलेज भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमात समाज बांधवांसह लातूरकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा बसवेश्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड.निलेश मुचाटे,स्वागताध्यक्ष प्रा.भालचंद्र येडवे पाटील यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक सिद्रामआप्पा पोपडे,माजी अध्यक्ष केदारआप्पा रासुरे,उपाध्यक्ष विश्वास आंबेकर,सचिव बालाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे,कोषाध्यक्ष लखन कावळे, कार्याध्यक्ष मुकेश उटगे,बालाजी पाटील रायवाडीकर,गणेश हेरकर,संयोजक नितीन मोहनाळे,जगदीश येरटे,बसवेश्वर हेंगणे,प्रा. ओमप्रकाश झुरुळे,ॲड.निखिल काळगे,सोमेश्वर ईश्वरशेटे, शिवकुमार रोडे, प्रमोद धुपे,लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे,सुशील वेळापुरे,निखिल शेटकार,शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे,मोहन मेंगशेट्टे, सुनील ताडमाडगे,किरण खोबरे आदिसह समाज बांधवांनी केले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रेणापूरमध्ये पंचशील ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात साजरा

**रेणापूर/प्रतिनिधी :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी भारतरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी सार्वजनिक जयंती अध्यक्ष मंडळ बौद्धनगर रेणापूर यांच्यातर्फे आपल्या रेणापूर शहरांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. या निमित्त आज सकाळी प्रथम बौद्धनगर नगर समाज मंदिर समोर पंचशील ध्वजारोहण कार्यक्रम रेणापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक साहेब मा. श्री. सुधाकर देडे साहेब यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. तदनंतर आंबेडकर चौक रेणापूर या ठिकाणी अध्यक्ष मंडळामार्फत अभिवंदन करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर पंचशील ध्वजारोहण कार्यक्रम जेस्ट सामाजिक कार्यकर्ते मा. श्री.उत्तमराव घोडके यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या स्वरूपात साजरा करण्यात आला. पंचशील ध्वजारोहण रेणापूर शहराच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव अकनगिरे यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष मा.श्री. रुपेश चक्रे हे होते तर प्रमुख पाहुणे रेणापूर नगरीचे माजी प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक मा.श्री.अभिषक अकनगिरे, राजू आतार, पंचायत समिती सभापती मोनिका रवी सूर्यवंशी, उप सभापती शरद दरेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंगरे, शहराचे नगरसेवक सचिन मोटेगावकर, शिवाजी पाटील, शेख वाहिद, कृष्णकांत मोटेगावकर, गणेश सौदागर, संतोष शिंदे, महेश गाडे, भूषण पनुरे, मोसिन शेख, रवी सूर्यवंशी, महानंदा दरेकर, डॉ.श्रीपती शिंदे, श्रीमंत नागरगोजे ,श्रीपाल बस्तापुरे, प्रल्हाद कोतवाड, शिवाजी अकनगिरे, सर्व पत्रकार बंधू श्री. विठ्ठल कटके, रफिक शिकलकर, चंद्रकांत कातळे, ईश्वर बद्दर, बाळ्या स्वामी, चंद्रकांत सूर्यवंशी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला पंचशील ध्वजारोहण कार्यक्रमामध्ये त्रिशरण पंचशील व बुद्ध वंदना प्रा. किशोर चक्रे यांनी घेतली ( भारतीय बौद्ध महासभा) सुरुवातीला आलेल्या मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व जयंती अध्यक्ष मंडळाच्या वतीने सर्वांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये रेनापुर शहराचे माजी प्रथम नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, रवी सूर्यवंशी, श्रीराम विद्यालय च्या शिक्षिका महानंदा दरेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक प्रा. किशोर चक्रे यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष रुपेश चक्रे यांनी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल कांबळे, शाम चक्रे,सुनील चक्रे,उत्तम चक्रे,अमोल चक्रे, विक्रम गायकवाड, धोंडीराम चक्रे,राजाभाऊ चक्रे,नितीन गायकवाड, राजाभाऊ घोडके, राजकुमार कांबळे,हनुमंत लांडगे,समाधान शिंदे अजय हनवते इत्यादी अध्यक्ष मंडळातील कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## प्लॅस्टिकचा वापर कमी करा; पर्यावरण संतुलनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा-विजयकुमार कट्टी

**मुंबई/प्रतिनिधी :** दैनंदिन जीवनात शासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी प्लॅस्टिकचा वापर कमीत-कमी करून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी केले.

वांद्रे (मुंबई) येथील महापारेषणच्या प्रकाशगंगा इमारतीत 'दैनंदिन जीवनात प्लॅस्टिक वापराबाबत जागृकता' या विषयावर आयोजिलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने उपस्थित होत्या.

यावेळी महापारेषणच्या संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, मुख्य विधी सल्लागार श्री. व्ही. के. पाटील, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)





श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती सीमा डुबेवार, उपमुख्य तपास अधिकारी श्री. प्रशांत गोरडे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विजयकुमार कट्टी पुढे म्हणाले की, घरात खराब अन्नपदार्थ साठविल्यास झुरळांचा प्रादुर्भाव वाढतो. तसेच सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर टाळणे अत्यंत गरजेचे आहे. पशू-पक्ष्यांना तळलेले पदार्थ देऊ नयेत आणि प्रत्येकाने निसर्गाशी सुसंगत वर्तन ठेवून अधिकाधिक वृक्षलागवड करावी. कार्यक्रमात अधिकाऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. अध्यक्षपदावरून बोलताना श्रीमती सुचिता भिकाने यांनी पर्यावरण संवर्धनासाठी अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची गरज अधोरेखित केली. ''वृक्षारोपण, गोसंवर्धन आणि प्लॅस्टिकचा कमी वापर या गोष्टी अंगीकारल्या तरच पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. अन्यथा महापुरांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागू शकतो,'' असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी केले, तर आभार व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांनी मानले.

टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंचा उपक्रम

यावेळी श्रीमती सुचिता भिकाने यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचा उपक्रम हाती घेणार असल्याची माहिती दिली. प्लॅस्टिकच्या पिशव्या, बॉटल्स तसेच जुने कपडे दर शुक्रवारी महापारेषणच्या कार्यालयात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. महिला बचत गटांच्या माध्यमातून या वस्तूंपासून उपयुक्त वस्तू तयार करण्यात येणार असून, देशी झाडे, स्वदेशी वस्तू आणि पर्यावरण संवर्धनावर भर देण्यात येणार आहे. पर्यावरणप्रेमी, स्वदेशीचा पुढाकार, पशु-पक्ष्यांविषयी आत्मीयता असलेल्या संवेदनशील अधिकारी श्रीमती सुचिता भिकाने यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## आंध्रचा कायापालट आता मुंबईच्या धर्तीवर

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई महानगर प्रदेशाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'च्या (एमएमआरडीए) कार्यपद्धतीचा ठसा आता राष्ट्रीय स्तरावर उमटू लागला असून, आंध्र प्रदेशच्या शहरी विकासासाठी आता 'मुंबई मॉडेल'चा आधार घेतला जाणार आहे. आंध्र प्रदेशात नव्याने स्थापन झालेल्या १८ नागरी विकास प्राधिकरणांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने शुक्रवारी 'एमएमआरडीए'ला भेट देऊन येथील प्रकल्पांच्या 'ब्लूप्रिंट'चा सखोल अभ्यास केला. राज्यातील शहरी विकासाला गती देण्यासाठी मुंबईचे हे विकास प्रारूप 'रोल मॉडेल' म्हणून स्वीकारण्याचा आंध्र प्रदेश सरकारचा मानस असून, त्या दृष्टीने या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.आंध्र प्रदेश सरकारच्या महानगरपालिका प्रशासन व नागरी विकास विभागाच्या क्षमता-वृद्धी उपक्रमांतर्गत हा महत्त्वपूर्ण दौरा आयोजित करण्यात आला होता.

या शिष्टमंडळात विविध प्राधिकरणांचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले वरिष्ठ आयएएस अधिकारी सहभागी झाले होते. शहरी प्रशासन, प्रकल्पांचे वित्तीय व्यवस्थापन, जमीन व्यवस्थापन आणि भव्य पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी यातील सर्वोत्तम पद्धती नेमक्या कशा राबवल्या जातात, हे तांत्रिकदृष्ट्या समजून घेणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.या वेळी शिष्टमंडळाला संबोधित करताना एमएम आरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी ठळक मुद्दे स्पष्ट केले. सक्षम शहरी वित्तीय क्षमता, जमीन अभिलेख व्यवस्था, ॲसेट मॅपिंग आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया यामुळे मोठे प्रकल्प यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषत: 'डिस्काउंटेड कॅश फ्लो' पद्धतीवर आधारित नियोजन आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल्सची सविस्तर माहिती त्यांनी या वेळी दिली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# यंदाच्या मिरवणुकीला मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील उपस्थित राहणार
# विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन; मार्गदर्शक धनंजय शिंगाडे यांची माहिती

धाराशिव (प्रतिनिधी)– बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या बोधिसत्व, विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने धाराशिव शहरात २२ एप्रिल रोजी सायंकाळी भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक उपक्रमांनी जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या मिरवणुकीला मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील उपस्थित राहून मिरवणुकीचे उदघाटन करणार असल्याची माहिती बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा जयंती समितीचे मार्गदर्शक धनंजय (नाना) शिंगाडे यांनी दिली.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, बलराज रणदिवे,, मसूद शेख, माजी नगरसेवक खालील सय्यद, नगरसेवक अजहर मुजावर, आयाज शेख, सतीश कदम, रोहीत पडवळ, लक्ष्मण माने, पांडू भोसले, अभिजित सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

शिंगाडे यांनी सांगितले की, बहुजन योद्धा सामाजिक संघटनेमार्फत गेली ३२ वर्षापासून धाराशिव येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमाने जयंती उत्सव साजरा करण्यात येतो. महापुरुषांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य संघटना सातत्याने करत आहे .मिरवणुकीत महिला, पुरूष, युवक मोठ्या संख्येने सहभागी होतात. विशेष म्हणजे जयंती उत्सव समितीमध्ये सर्व जाती-धर्मातील व्यक्तींचा समावेश असून दरवर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने विशेषतः पारंपारिक वाद्यांच्या गजरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येते. तसेच रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, रुग्णांना फळे वाटप, वृक्ष लागवड यासह विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. जयंती उत्सव समितीच्या वतीने यावर्षी देखील विविध राज्यातील पारंपारिक वाद्य समूहांना आमंत्रित करण्यात आल्यामुळे ही मिरवणूक वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. सध्या जगात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचा देखावा मिरवणुकीचे आकर्षण ठरणार आहे. तसेच जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

**२२ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता जिजाऊ चौक येथून मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. सायंकाळी धाराशिव शहरातील क्रांती चौक भीमनगर येथून भव्यदिव्य मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. शहरातील प्रमुख मार्गावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मिरवणुकीची सांगता होणार आहे. या भव्यदिव्य मिरवणुकीत सर्व जाती-धर्मातील आंबेडकरी विचारांच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही शिंगाडे यांनी केले.**

# धाराशिवमध्ये संभाजी ब्रिगेडची बैठक निलेश साळुंके यांची जिल्हा संघटकपदी नियुक्ती

धाराशिव (प्रतिनिधी)- संभाजी ब्रिगेड (पक्ष) यांची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी धाराशिव येथे जिल्हाध्यक्ष आकाश मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत संघटन बळकटीसाठी विविध निर्णय घेण्यात आले.यावेळी निलेश पार्वती राम साळुंके यांची संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संघटकपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बैठकीस संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब गाडेकर, जिल्हा सचिव आदित्य देशमुख, जिल्हा संघटक शाहनवाज सय्यद व गणेश साळुंखे, शहराध्यक्ष शिवश्री शुभम चव्हाण, शहर कार्याध्यक्ष पवन आवटे, शहर संघटक अमर घोडके, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, तालुका कार्याध्यक्ष संतोष लाकाळ यांच्यासह प्रजय पवार, नितीन मुंडे, गोविंद पाटील, आकाश सहाणे, रवी चव्हाण, अमोल पाटील, खंडू कसबे, श्रावण धावारे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष विजय बाप्पा पवार व शहराध्यक्ष महेश इंगळे यांनीही बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन केले.बैठकीत संघटन विस्तार, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# महावितरण कार्यालयास विधी विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट: वीज कायदे व ग्राहक हक्कांवर सविस्तर मार्गदर्शन



धाराशिव, (प्रतिनिधी)- येथील डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयातील प्रथम व तृतीय वर्षाच्या विधी विद्यार्थ्यांनी महावितरणच्या संरक्षण व सुरक्षा मंडळ कार्यालय, धाराशिव येथील वीज तक्रार निवारण मंच (सीजीआरएफ) विभागास शैक्षणिक भेट दिली. या प्रसंगी कार्यकारी अभियंता व वीज तक्रार निवारण मंचाच्या सचिव नीलांबरी कुलकर्णी तसेच स्वतंत्र सदस्य मेधा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

नीलांबरी कुलकर्णी यांनी वीज कायद्यातील बदल, स्मार्ट मीटरची अंमलबजावणी तसेच वीज चोरी रोखण्यासाठीच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

तर मेधा कुलकर्णी यांनी ग्राहक संरक्षण कायद्याविषयी मार्गदर्शन करताना ग्राहकांचे हक्क, त्यांचे संरक्षण तसेच वीज तक्रार निवारण मंचाचे कार्य स्पष्ट केले. या मंचाद्वारे ग्राहकांना तक्रार नोंदवून त्याचे निवारण कसे केले जाते, याची प्रात्यक्षिक उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी स्मार्ट मीटर व वीज चोरीसंदर्भात विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. ही भेट प्रा. डॉ. पूनम दागडिया/तापडिया यांच्या समन्वयातून पार पडली. महाविद्यालयाचे प्राचार्य कायला कृष्णमूर्ती यांनी मार्गदर्शन केले. या भेटीस मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# धाराशिवात डॉल्बीचा दणदणाट महागात! तब्बल ४२ जणांवर गुन्हे – पोलिसांची मोठी कारवाई

**धाराशिव (रामेश्वर डोंगरे )-** शहरात १४ एप्रिल रोजी काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान ध्वनीप्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवत कर्णकर्कश आवाजात डीजे (डॉल्बी) वाजवणाऱ्या डीजे मालक व आयोजकांवर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ४२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

१४ एप्रिल रोजी शहरात विविध ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. पोलिसांनी याआधीच आयोजकांना परवानगी देताना स्पष्ट अटी घातल्या होत्या.

आवाज मर्यादित ठेवणे, रात्री ठराविक वेळेतच डीजे बंद करणे, ध्वनीप्रदूषण नियमांचे पालन, मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष करत क्रांती चौक, काळा मारुती चौक, सम्राट चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर डीजेचा अक्षरशः दणदणाट करण्यात आला.

कर्णकर्कश आवाजामुळे नागरिक, महिला, लहान मुले त्रस्त झाल्या होते. बंदोबस्तावरील पोलिसांना मोठा त्रास जाणवला.

पोलीस निरीक्षक दराडे यांच्या आदेशानुसार उपनिरीक्षक संदीप शहाजी आहोळे यांच्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत बसवराज रा. बौध्द नगर प्राथमिक शाळेजवळ पुणे ह.मु. समुद्राळ ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१६.०३.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील ॲटो रिक्षा क्र एमएच १४ केयु ४५५३ हा एनएच ६५ रोडवर अशोक चौक येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. तसेच भुम पोलीस ठाणे अंतर्गत उमेश रा. साठे नगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१६.०३.२०२६ रोजी १२.२० वा. सु. आपल्या ताब्यातील पिकअप क्र एमएच ०१बीआर १५०८ हा गोलाई चौक भुम येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द येथे गुन्हा नोंदवला आहे.

# पालकमंत्री सरनाईकांच्या आदेशान्वये अजय पाटील यांचे येडेश्वरी यात्रा काळात नियोजन यशस्वी; एसटी च्या उत्पन्नात६२ लाख ६६ हजारांची घसघशीत वाढ.!

धाराशिव (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ धाराशिव विभागाच्यावतीने येरमाळा येथील येडेश्वरी यात्रेसाठी भाविकांच्या सेवेसाठी धाराशिव, उमरगा, भूम, तुळजापूर, कळंब व परंडा या आगारातून १२४ बसेस भाविकांच्या सेवेसाठी धावल्या. दि.१ ते ५ एप्रिल दरम्यान १ हजार ३६८ बसच्या फेऱ्या करण्यात आल्या. या माध्यमातून विभागाला ६२ लाख ६६ हजार ५७८ रुपये उत्पन्न झाले असल्याची माहिती विभाग नियंत्रक अजय पाटील यांनी दिली आहे.

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या यात्रेसाठी लाखो भाविक दरवर्षी दर्शन घेण्यासाठी येरमाळा नगरीत दाखल होत असतात. या यात्रे दरम्यान भाविकांची प्रवासाची गैरसोय होऊ नये यासाठी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशानुसार धाराशिव विभाग नियंत्रक पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व आगार व्यवस्थापक यांच्याशी समन्वय साधून नियोजन केले. त्यामुळे प्रवाशांना प्रवास सुकर आणि सोयीचा करून दिला. या माध्यमातून एसटी महामंडळाच्या उत्पन्नातही देखील घसघशीत भर पडली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धाराशिव विभागाने १ एप्रिल ते ५ एप्रिल या कालावधीत खास भाविकांच्या सोयीसाठी विशेष प्रवास बससेवा राबवली. या कालावधीत धाराशिव, उमरगा, तुळजापूर, कळंब, भूम आणि परंडा या आगारांतून एकूण १२४ बस चालवण्यात आल्या. या बसेनी १३६८ फेऱ्या पूर्ण केल्या. त्यासाठी १० लाख ९३ हजार ३१० किलो मीटर अंतर पार केले. यात्रे दरम्यान १ लाख ४१ हजार ९५५ प्रवाशांनी एसटीचा प्रवास करत एकूण ६२ लाख ६६ हजार ९७८ रुपयांचे उत्पन्न मिळाली आहे. योग्य नियोजन केल्यामुळे यात्रे कालावधीत एका देखील भाविकाला वाहतुकीची अडचण भासली नाही.

विशेष म्हणजे, तुळजापूर आणि कळंब आगारांनी सर्वाधिक फेऱ्या आणि उत्पन्न मिळविले आहे. तर धाराशिव आगारातून सर्वाधिक बस सोडण्यात आल्या. यात्रेत लाखो भाविकांची गर्दी असताना देखील शिस्तबद्ध नियोजनामुळे वाहतूक व्यवस्थेवर कोणताही ताण जाणवला नाही किंवा वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली नाही. विशेष म्हणजे नियमितपणे सर्व बसेस भाविकांना नेण्याचे आणि आणण्याचे काम करीत होत्या. पाटील यांच्या नेतृत्वाखाली एसटी अधिकाऱ्यांनी केवळ प्रवाशांची गैरसोय टाळण्यावरच भर दिला नाही, तर एसटीच्या उत्पन्न वाढीकडेही विशेष लक्ष केंद्रित केले. जादा बसची कार्यक्षम नियोजनबद्ध रचना केल्यामुळे उत्पन्नात भर पडली. पालकमंत्री सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग नियंत्रक पाटील यांनी केलेल्या अंमलबजावणीमुळे एसटी महामंडळाने हे उत्पन्न मिळवले आहे. त्यामुळे यात्रेच्या काळात वाहतूक व्यवस्थित पुरवणारी यंत्रणा फक्त एसटी महामंडळात व्यवस्थितपणे पुरवू शकते हे पुन्हा सिद्ध झाले आहे.




आगार निहाय बसची संख्या, बसच्या एकूण फेऱ्या, कापलेले अंतर किलो मीटरमध्ये, मिळालेले उत्पन्न व प्रवासी संख्या पुढील प्रमाणे - धाराशिव आगार एकूण बस संख्या २२, एकूण केलेल्या फेऱ्या १८६, कापलेले अंतर ११८२३ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न ८०४८३८ रुपये व प्रवासी संख्या - १२०८७, उमरगा आगार एकूण बस संख्या ७, एकूण फेऱ्या ४४, कापलेले एकूण अंतर ६२३२ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न ३२६४५९ रुपये व ३६५१ प्रवासी संख्या तसेच भूम आगार एकूण बस संख्या - २१, एकूण केलेल्या बस फेऱ्या - २२८, कापलेले अंतर - १५१११ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न - १०८८४० रुपये व प्रवासी संख्या - १३८६९ तर तुळजापूर आगार एकूण बस संख्या - २४, एकूण बस फेऱ्या - ३७०, एकूण कापलेले अंतर २८७५४ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न - १५१८४३८ रुपये व प्रवासी संख्या - २४६९९ तर कळंब आगार एकूण बस संख्या - २४, एकूण केलेल्या फेऱ्या - २६५, कापलेले अंतर - ३०१४१ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न - १७३३४८७ रुपये व २४६७१ प्रवासी संख्या आणि परंडा आगार बसची संख्या - २०, एकूण केलेल्या फेऱ्या - २७५, एकूण कापलेले अंतर - १७३२२ किलो मीटर, मिळालेले उत्पन्न - ९७४५१६ रुपये व प्रवासी संख्या - १६१३७ अशा एकूण १२३ बसेस विभागातून यात्रेसाठी धावल्या असून त्यांनी १ हजार ३६८ यात्रेसाठी प्रवास फेऱ्या मारल्या तर १ लाख ९ हजार ३९० किलो मीटर अंतर कापले तसेच एकूण मिळालेले उत्पन्न - ६२ लाख ६६ हजार ५७८ रुपये आणि ९४ हजार ११४ प्रवाशांनी यात्रेसाठी हजेरी लावली. एकंदरीतच येडेश्वरी देवी एसटी महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नासाठी पावली असल्याचे चित्र दिसत आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649